सत्यमेव जयते

विधानसभा आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

पाचवा अहवाल

[सन १९९३ चे दुसरे ते २०१३ च्या दुस-या (पावसाळी) अधिवेशनातील उर्वरित प्रलंबित आश्वासनांसंबंधीचा अहवाल]

(दिनांक एप्रिल, २०१६ रोजी विधानसभेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१६

महाराष्ट्र विधानसभा

आश्वासन समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

पाचवा अहवाल

[सन १९९३ चे दुसरे ते २०१३ च्या दुस-या अधिवेशनातील
उर्वरित प्रलंबित आश्वासनांसंबंधीचा अहवाल]

विधानसभा आश्वासन समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

१. श्री. गुलाबराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

२. श्री. मधुकरराव चव्हाण, वि.स.स.
३. श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.
४. श्री. धनंजय ऊर्फ सुधीर गाडगीळ, वि.स.स.
५. प्रा. मेधा कुलकर्णी, वि.स.स.
६. श्री. लक्ष्मण पवार, वि.स.स
७. श्री. विलासराव जगताप, वि.स.स.
८. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
९. श्री. समीर मेघे, वि.स.स.
१०. श्री. जयप्रकाश मुंदडा, वि.स.स.
११. श्री. संजय शिरसाट, वि.स.स.
१२. श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स.
१३. श्री. रणजित कांबळे, वि.स.स
१४. श्री. डी. पी. सावंत, वि.स.स.
१५. श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
१६. श्री. राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.
१७. श्री. अवधूत तटकरे, वि.स.स.
१८. श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.
१९. श्री. विलास तरे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(४) श्रीमती सायली कांबळी,अवर सचिव
(५) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(६) श्री. जगदीश टोपरे, कक्ष अधिकारी.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विषय			पृष्ठ क्रमांक
(१)	(२)			(३)
	प्रस्तावना :	. .	. .	(सात)
१	विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या	. .	. .	१
२	अभिप्राय व शिफारशी	. .	. .	३
	परिशिष्टे :			
	परिशिष्ट एक.--आश्वासनांवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती	. .	. .	१९
	परिशिष्ट दोन.--आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके	. .	. .	८१
	परिशिष्ट तीन.--आश्वासनांवरील कार्यवाहीचे नमुना विवरण	. .	. .	४७५
	परिशिष्ट चार.--समितीच्या बैठकांचे कार्यवृत्त	. .	. .	४७९

प्रस्तावना

मी, विधानसभा आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून तिच्या वतीने समितीचा पाचवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे. सन १९९३ चे दुसरे ते सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनात विधानसभेत शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काही प्रलंबित आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही यासंदर्भात विभागांकडून प्राप्त झालेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा समितीचा हा अहवाल आहे.

सन १९९३ चे दुसरे ते सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनाच्या कालावधीत शासनाकडून विधानसभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काही प्रलंबित आश्वासनांच्यासंदर्भात आश्वासन समितीचा सदरहू पाचवा अहवाल तयार करण्यात आला आहे.

आश्वासनांबाबत विभागाने केलेली कार्यवाही परिशिष्ट ''एक'' मध्ये देण्यात आली असून आश्वासनांसंदर्भातील शासन निर्णय/परिपत्रके परिशिष्ट ''दोन'' मध्ये देण्यात आले आहेत. तसेच आश्वासनांबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे नमुना विवरणपत्र परिशिष्ट ''तीन'' मध्ये देण्यात आली आहे व समितीच्या बैठकांची संक्षिप्त माहिती परिशिष्ट ''चार'' मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

समितीने सदरहू अहवालावर दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत विचार करून तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : ५ एप्रिल, २०१६.

समिती प्रमुख,
विधानसभा आश्वासन समिती.

अहवाल

सन १९९३ चे दुसरे ते २०१३ चे दुसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या

सन १९९३ चे दुसरे ते २०१३ चे दुसरे अधिवेशनात शासनाने खालीलप्रमाणे आश्वासने दिली आहेत. सदरच्या आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी त्यासमोर दर्शविलेल्या दिनांकास विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली.

सन १९९३ चे दुसरे ते सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनामध्ये देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीबाबत पटलवार ठेवलेल्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व संख्या

अ.क्र.	अधिवेशन/वर्ष	आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे पटलवार ठेवल्याचा दिनांक	आश्वासन क्रमांक	आश्वासन संख्या
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	सन १९९३ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	९,	०१
२	सन १९९३ चे तिसरे	-----''-----	६९०,	०१
३	सन १९९५ चे दुसरे	-----''-----	७८७,	०१
४	सन १९९६ चे पहिले	-----''-----	२,	०१
५	सन १९९६ चे पहिले	२१ जुलै २०१५	२४२	०१
६	सन २००३ चे चौथे	१४ डिसेंबर २०१५	५९४	०१
७	सन २००३ चे पाचवे	१८ डिसेंबर २०१४	६३७	०१
८	सन २००४ चे दुसरे	-----''-----	२७९	०१
९	सन २००५ चे पहिले	-----''-----	४५७	०१
१०	सन २००५ चे तिसरे	२१ जुलै २०१५	४८१	०१
११	सन २००६ चे पहिले	१८ डिसेंबर २०१४	७८९	०१
१२	सन २००६ चे दुसरे	-----''-----	२०१, ६५१	०२
१३	सन २००६ चे तिसरे	-----''-----	१४४, ५१०	०२
१४	सन २००७ चे पहिले	-----''-----	८४२	०१
१५	सन २००७ चे पहिले	२१ जुलै २०१५	१०२७	०१
१६	सन २००७ चे पहिले	१४ डिसेंबर २०१५	१८६, १८९, १९१, १९२	०४
१७	सन २००७ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	१७२०	०१
१८	सन २००७ चे तिसरे	-----''-----	२२७२, २२९३, २२९४, २४३२,	०४
१९	सन २००८ चे पहिले	१८ डिसेंबर २०१४	५१०,	०१
२०	सन २००८ चे पहिले	२१ जुलै २०१५	३४९, ३५०,	०२
२१	सन २००८ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	१०४६,	०१
२२	सन २००८ चे तिसरे	-----''-----	१३०८, १३५४, १३७०, १४८८	०४
२३	सन २००८ चे तिसरे	२१ जुलै २०१५	१२३१	०१
२४	सन २००९ चे पहिले	१८ डिसेंबर २०१४	१७, १८	०२
२५	सन २००९ चे दुसरे	२१ जुलै २०१५	१६८	०१
२६	सन २००९ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	१०८, ३१८, ४९३, ४९४	०४
२७	सन २००९ चे चौथे	-----''-----	५२२	०१

२८	सन २०१० चे पहिले	-----''-----	४९७, ६७७, ७१३, ८८५, १०२३, १२०३, १२४५,	०७ ०३
२९	सन २०१० चे पहिले	२१ जुलै २०१५	५१, ५२, ५३	०४
३०	सन २०१० चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	१६९, २२१, ४९५, ५३२	०३
३१	सन २०१० चे दुसरे	२१ जुलै २०१५	१७१, १७२, १७५	०१
३२	सन २०१० चे दुसरे	१४ डिसेंबर २०१५	३५३	
३३	सन २०१० चे तिसरे	१८ डिसेंबर २०१४	११०, २४८, ३४७, ३८६, ३९०, ३९१, ३९२, ५५६, ५५७, ५५८, ५८०, ५८१.	१२
३४	सन २०११ चे पहिले	-----''-----	१४८, १६६, २८०, २८१, २८२, २८३, ३३८, ३३९, ३४२, ३६८, ४००, ४३६, ८६३, ८६५, ९७५, ९७८.	१६
३५	सन २०११ चे पहिले	२१ जुलै २०१५	५३२,	०१
३६	सन २०११ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	६३, ६५, ११७, १४६, ३१३	०५
३७	सन २०११ चे तिसरे	-----''-----	१०२, १०५, १३५, १९४	०४
३८	सन २०१२ चे पहिले	-----''-----	७०, ९५, ९९, १५०, २४४, २४७, ५६२, ५६३, ५६४, ५६५, ५६७, ५६८, ५६९, ६७८,	१४
३९	सन २०१२ चे पहिले	२१ जुलै २०१५	५५२	०१
४०	सन २०१२ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	११०, १११, ३७४, ३८९, ४५६	०५
४१	सन २०१२ चे दुसरे	२१ जुलै २०१५	१४, १५, १७८, ४९३	०४
४२	सन २०१२ चे तिसरे	१८ डिसेंबर २०१४	१०८, ११०, १३७, १४५, २११, २१४, २४६, २४७, २६०, २६१, ३९७.	११
४३	सन २०१२ चे तिसरे	१४ डिसेंबर २०१५	१२	०१
४४	सन २०१३ चे पहिले	-----''-----	१८, २५, ४५, ६६, ७०, ९०, ९२, १५८, १६५, १६६, १६७, १७१, २२०, २६७, २८५, ३०३, ४०९, ४२२, ४२८, ४८८, ५३०, ५३४, ५३५, ५४८.	२४
४५	सन २०१३ चे पहिले	२१ जुलै २०१५	१५९, ३८४	०२
४६	सन २०१३ चे दुसरे	१८ डिसेंबर २०१४	७, १०, ३९, ४१, ५८, ५९, ६२, ७६, ८७, १०१, १२४, १४४, १४६, १५९, १६३, २३५, २८२, ३२२, ३२३, ३३२, ३३९, ३४०, ३४८, ३४९, ३५०, ३५५, ३५६, ३५७, ३६७, ४१०, ४११, ४१३, ४१४, ४२४, ४२६, ४२८, ४४१.	३७
४७	सन २०१३ चे दुसरे	२१ जुलै, २०१५	२५९, २६०, २६१, २६२, ३०२, ३०९, ३१०, ३३३, ४४०.	०९
		एकूण . .		**२०७**

सर्वसाधारण अभिप्राय व शिफारशी

विधानसभा सभागृहात मा.सदस्यांद्वारा विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींवरील चर्चेला उत्तर देत असताना मा.मंत्री महोदयांकडून आश्वासने, अभिवचने दिली जातात. सभागृहात दिलेल्या सदर आश्वासनांची पूर्तता शासनाने ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. तथापि, बहुतेक प्रकरणात आश्वासनांच्या पूर्ततेसाठी सदर विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागत असलेल्या बाबी समितीने आपल्या यापूर्वी सादर केलेल्या विविध अहवालांद्वारा वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या असूनही त्यामध्ये शासनाकडून आश्वासनांची पूर्तता करण्यामध्ये फारशी सुधारणा झाल्याचे समितीला आढळून येत नाही. प्रलंबित आश्वासने विचारात घेता ज्या आश्वासनामध्ये शासन स्तरावर कार्यवाही करणे, त्याची पूर्तता करणे सहज शक्य आहे. अशी आश्वासने देखील शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिका-यांच्या उदासीनतेच्या धोरणामुळे विधानमंडळास सादर करण्यात कमालीचा विलंब होत आहे. ज्या आश्वासनांसंदर्भात विषय न्यायालयाच्या अधिकार कक्षेत आहेत अशा आश्वासनांसंदर्भात विलंब होत असल्यास ती बाब समजण्यासारखी आहे. तथापि, जी आश्वासने शासनाच्या स्तरावर वेळीच निपटारा करणे शक्य असतात अशी आश्वासने वेळेत पाठविण्यामध्ये जी दिरंगाई शासनाकडून दाखविली जाते ती अक्षम्य आहे असे समितीचे मत आहे. यासाठी समितीला संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक वाटते, कारण विलंबाने येणा-या आश्वासनांमुळे सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध संसदीय आयुधांवर मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या अभिवचन अथवा आश्वासनांची वेळीच पूर्तता झाली नसेल तर सभागृहात जे सन्माननीय सदस्य राज्यातील सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले विषय उपस्थित करतात, ज्या बाबींसंदर्भात शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत उहापोह केला जातो त्यात सुधारणा अथवा आणखी काही बदल करण्याची मागणी विविध संसदीय आयुधांमार्फत सभागृहात केली जाते व अशी मागणी मा.मंत्री महोदयांच्या माध्यमातून आश्वासनांच्या रुपाने सभागृहात पूर्तता झाल्यानंतरच सदरच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून संबंधित संसदीय आयुध तेवढ्यापुरते सभागृहात थांबविले जाते. याचा अर्थ असा आहे की, जे आश्वासन सभागृहात दिले जाते त्यावर शासनाने सर्वंकष कार्यवाही करून त्याचा पूर्तता अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे अपेक्षित आहे. तद्वतच विधानसभेच्या या समितीकडे सदरच्या आश्वासनपूर्ततेचा परिपूर्ण अहवाल पाठविणे आवश्यक आहे. **तथापि, अधिका-यांद्वारा या बाबींसंदर्भात अक्षम्य विलंब केला जात असल्यामुळे याची जबाबदारी संबंधित अधिका-यांवर निश्चित करून त्या संदर्भात शासनाने कडक धोरण आखून सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ही कोणत्याही परिस्थितीमध्ये ९० दिवसांच्या आत होणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणात न्यायालयीन अडथळे आहेत अथवा पूर्ततेबाबत काही अडचणी आहेत अशा बाबीदेखील शासनाने समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. म्हणून यासाठी शासनाने एक सर्वंकष निर्णय घेऊन या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत संबंधित विभागाचे उप सचिव तथा सह सचिव यांच्यावर जबाबदारी निश्चित करून आश्वासन पूर्ततेसंदर्भात जाणीवपूर्वक दिरंगाई झाल्यास अशा अधिका-यांविरुद्ध ठोस कारवाई करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा. तसेच दर तीन महिन्याला संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी म्हणजेच सचिव/ प्रधान सचिव यांनी त्यांच्या विभागाच्या संबंधित उप सचिव/ सह सचिव यांचे समवेत आश्वासनांच्या पूर्ततेबाबत आढावा बैठका घेऊन मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासने/ अभिवचने संदर्भात जी आश्वासने/ अभिवचने सहज पूर्ण करणे शक्य आहे, अशा बाबतीत त्वरेने निर्णय घेऊन त्याबाबतचे विवरणपत्र संसदीय कार्य विभागामार्फत सभागृहाला पाठविण्याची कार्यवाही तत्परतेने व त्वरेने करावी तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सन १९९३ चे दुसरे ते सन २०१३ च्या दुस-या अधिवेशनात शासनाने दिलेल्या आश्वासनांपैकी प्रलंबित असलेल्या आश्वासनांतील २१० आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे डिसेंबर २०१४ ते जून २०१५ या कालावधीत विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवली. या २१० आश्वासनांपैकी समितीने २१० आश्वासनांचे वाचन करून त्यावर निर्णय घेतला, शासनाने केलेल्या या कार्यवाहीबद्दल समिती समाधान व्यक्त करते.

मा. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आश्वासनावर केलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर विलंबाने ठेवणे ही एक मोठी समस्या आहे. यात संसदीय कार्य विभागाने संबंधित विभागाशी संपर्क ठेवून कोणत्याही परिस्थितीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणारी विवरणपत्रे विहित मुदतीत सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. सदरची विवरणपत्रे विलंबाने पटलावर ठेवल्यामुळे संबंधित आश्वासने उक्त संसदीय आयुधातील विषय कालबाह्य झाल्याने विचारात घेणे समितीला शक्य होत नाही. परिणामी समितीच्या कामकाजात व्यत्यय निर्माण होतो. या बाबीसंदर्भात देखील शासनाने कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे.

संसदीय लोकशाही प्रक्रियेमध्ये सभागृहात देण्यात येणा-या आश्वासनांना अनन्य साधारण महत्व आहे. मा.सदस्यांनी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या विषयांवर चर्चा उपस्थित करून संबंधित मंत्रिमहोदयांना त्यावर लगेच कार्यवाही करणे शक्य होत नसल्याने काही विषयांच्या बाबतीत आश्वासने दिली जातात. अशा आश्वासनांची पूर्तता सुदृढ संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत आवश्यक आहे. कारण या आश्वासनांचा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेवर प्रभाव पडत असतो आणि सदरच्या आश्वासनांची वेळीच पूर्तता झाल्यास जनतेमध्ये त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून येतो. तथापि, वर्षानुवर्षे आश्वासनांची पूर्तता न झाल्यास जनतेचा शासन व्यवस्थेवरील विश्वास उडून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतीय संविधानात विधानमंडळाच्या दोन अधिवेशनामधील कालावधी हा सहा महिन्यांपेक्षा जास्त असू नये अशी तरतूद आहे. या तरतुदीस अनुसरुन आपल्या राज्यातील राज्य विधानमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होत असतात. ज्याला आपण उन्हाळी (अर्थसंकल्पीय), पावसाळी, आणि हिवाळी अधिवेशने असे संबोधतो. म्हणूनच सभागृहात देण्यात येणा-या प्रत्येक आश्वासनांच्या पूर्ततेचा कालावधी हा ९० दिवसांचा ठेवण्यात आलेला आहे. या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची/ अभिवचनांची पूर्तता ज्या अधिवेशनात दिली त्याच्या पुढच्या अधिवेशनात त्याची पूर्तता व्हावी हा उद्देश आहे. शासनाच्या विविध योजना राबविताना अशा आश्वासनांची पूर्तता करताना शासनाच्या संबंधित विभागास पुरेसा वेळ मिळावा ही या मागील भूमिका आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाच्या सर्व संबंधित अधिका-यांचे कर्तव्य असते की, **सभागृहात मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आश्वासीत केलेले आश्वासन प्रस्तावित करून त्यानंतर निर्णय घेऊन त्यानंतर येणा-या लगतच्या अधिवेशनात आश्वासनांची पूर्ततेची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. विधासभेच्या नियमानुसार आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनास ९० दिवस इतक्या कालावधीची मर्यादा घालून दिलेली आहे. सदर मर्यादेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये, यासाठी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित केल्यास बहुतांशी आश्वासनांची पूर्तता ही वेळेत किंबहुना वेळेच्या आधीदेखील होऊ शकते असे समितीचे ठाम मत आहे. सबब, आश्वासनांचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत ठेवण्यासाठी शासनाने कडक धोरण आखावे. आश्वासनाची पूर्तता जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सरपणे विलंबाने करणा-या संबंधित विभागाच्या उप सचिव/ सह सचिव दर्जाच्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन उक्त अधिका-यांनी त्यांच्या कार्यकाळात त्या संदर्भात नस्ती प्रस्तावित करून आश्वासन पूर्ततेचा पाठपुरावा करून व तसे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाने सर्वंकष निर्णय घेऊन या संदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे व त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रलंबित आश्वासनांची संख्या विचारात घेता ती मोठ्या प्रमाणावर आहे. सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणा-या आश्वासनांची संसदीय कार्य विभागाकडून विविध विभागाद्वारे पाठविलेली आश्वासने एकत्रित करून ती सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. अशा आश्वासनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्यातील वेगवेगळ्या विभागाकडून संसदीय विभागाकडे पाठविण्यात आलेली आश्वासने याचे एकत्रित संकलन करून त्याचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते. अशा संकलित केलेल्या आश्वासनाच्या विवरणाच्या प्रती अहवालाच्या माध्यमातून विधानमंडळाला सादर कराव्या लागतात. या आश्वासनांची पूर्तता ''हार्ड कॉपी'' च्या स्वरूपात येत असल्यामुळे त्याच्या तपासणीचा विधानमंडळाच्या कर्मचारी वृंदांवर अतिरिक्त ताण पडतो. म्हणून विभागाने आश्वासनांची पूर्तता संसदीय कार्य विभागाकडे करताना विवरणपत्रे ''सॉफ्ट कॉपी'' मध्ये अर्थातच ''पेनड्राईव्ह'' मध्ये घेऊन संसदीय कार्य विभागाकडे सादर करावी व संसदीय कार्य विभागाने अशा एकत्रित जमा झालेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता एकत्रित सॉफ्ट कॉपीमध्ये घेऊन ती विधानमंडळाकडे सादर करावी व अशा एकत्रित केलेल्या विवरणपत्राची माहिती **शासनामार्फत वेळोवेळी पटलावर ठेवण्यात येणा-या वर्षनिहाय व प्रत्येक अधिवेशननिहाय आश्वासनांबाबतच्या पूर्ततेबाबतची कार्यवाही विवरणपत्रासह कॉम्पॅक्ट् डिस्क (सी.डी.) स्वरूपात घेऊन सादर करावी. याकामी शासनाचा खर्च कमी होण्याच्या दृष्टीकोनातून पेपरलेस स्वरूपात माहिती समितीला पुरविण्यात यावी अशीही समितीची आग्रहाची मागणी आहे. आश्वासनांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयीन विभागाकडून समितीपुढे ठेवण्यासाठी पाठविण्यात येणा-या विवरणपत्रात आश्वासनांचे विषय, मंत्री/ राज्यमंत्री महोदयांकडून सभागृहात देण्यात आलेली आश्वासने व करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा विभागाने केलेला उल्लेख यामध्ये ब-याच वेळेला विसंगती व तफावत आढळून येत असते. आश्वासनांचा विषय व त्याच्या पूर्ततेबाबतदेखील तफावत दिसून येत असते. याचाच अर्थ संबंधित अधिकारी हे वेळ मारुन नेण्यासाठी समितीपुढे हलगर्जीपणाने आश्वासनांची पूर्तता करीत असतात. आश्वासनांची पूर्तता ही विषयाच्या अनुषंगाने सुसंगत व परिपूर्ण असणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीत पहिल्या वाचनाच्या वेळी विवरणपत्रात आढळून येणा-या त्रुटींबाबत समिती गांभीर्याने घेत असून यापुढील काळात समितीसमोर ठेवण्यात येणा-या आश्वासनांच्या पूर्ततेबाबतची**

विवरणपत्रे ही कोणत्याही परिस्थितीत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांशी सुसंगत व आश्वासनांच्या कक्षेत असल्याबाबत खात्री करूनच समितीकडे परिसृत करावीत व या संदर्भात शासनाने सर्वंकष परिपत्रक त्वरेने निर्गमित करून त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

महसूल व वन विभाग

सन २००५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ४५७

विधानसभा कामकाज खंड- १४०, पृ.क्र. १२, दिनांक ३० मार्च २००५. मा. महसूल राज्यमंत्री यांनी दिलेले.

''खोपोली तालुक्यातील खालापूर तालुक्याच्या संदर्भात जमीन महसूल कायदा १९६६ बदलण्याबाबत'' श्री. देवेंद्र साटम वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयावर मा. महसूल राज्यमंत्री यांनी **''याची नोंद घेण्यात येईल.''** असे आश्वासन दिले होते.

विभागाने केलेल्या कार्यवाहीत असे नमुद केले आहे की, संबंधित मंडळ अधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन खात्री केली असता खोपोली गावठाण क्षेत्रातील काही व्यापारी घराच्या पुढील भागात व्यवसाय करून त्याच घरात मागील भागात रहात आहेत. तथापि, काही लोकांनी त्यांच्या घरातील गाळे भाड्याने दिलेले आहेत. तहसिलदार खालापूर यांनी या ५२३ गाळेधारकांना नोटीसा बजावल्या असून त्यांचेकडून सुमारे रु. १२, ८५, ०२० रक्कम येणे अपेक्षित होते. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे १२३ (अ) नुसार तहसिलदार यांच्या मागणी नोटिसींना उत्तर म्हणून वैयक्तीक कागदोपत्री पुराव्यानिशी खुलासा केलेला नाही. सदरचे धारक हे खोपोली गावठाण क्षेत्रातील धारक आहेत. त्यामुळे त्यांना कलम १२३ (अ) ची तरतूद लागू होईल परंतू, त्यांनी कागदपत्र पुरावा म्हणून सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे १२३ (ब) नुसार नगराच्या किंवा शहराच्या जागात असलेल्या निवासी इमारतींना अकृषिक आकारणीत सूट आहे. मात्र तहसिलदार, खालापूर यांचे सर्वेक्षणानुसार खोपोली नगरपरिषद हद्दीतील ३३९ बांधकामे स.नं. मधील असून त्यांनी अनधिकृत वाणिज्य वापर सुरू केलेला आहे. त्यामुळे सदरहू धारक उक्त तरतुदीमध्ये बसत नसल्यामुळे त्यांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ६७ तसेच ४५ मधील तरतुदी लागू होतात व अशा खातेदारांना बजावलेल्या नोटिंसाप्रमाणे त्यांनी अकृषिक आकारणीची रक्कम भरणे आवश्यक आहे. तथापि, वसुलीच्या नाटिसीप्रमाणे वसुलीची कोणत्याही प्रकारची कार्यवाही आतापर्यंत करण्यात आलेली नाही.

विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे व उपरोक्त आश्वासन हे सन २००५ चे असून आश्वासनाची पूर्तता करण्यास १० वर्ष इतका विलंब झाला आहे. याप्रकरणी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे निश्चित केले. विभागीय सचिवांनी आश्वासना संदर्भात समितीसमोर अधिक माहिती दिली की, खोपाली तालुक्यातील खालापूर तालुक्याच्या संदर्भात जमीन महसूल कायदा १९६६ बदलण्याबाबत आश्वासन देण्यात आले होते. त्यावेळी ''नोंद घेण्यात येईल'' असे आश्वासन मंत्री महादेयांकडून देण्यात आले होते. महाराष्ट्र लँड रेव्हेन्यू कोड मधील सेक्शन १२३ अंतर्गत कोणत्या परिस्थितीत सारा माफी दिली जाते, हे नमूद केले आहे. कलम १२३ मधील (अ) मध्ये अशी तरतूद आहे की, शहरी भागातील रहिवासी वापराकरिता सारा माफी केलेली आहे. खालापूर तालुक्यातील भागात पूर्णपणे रहिवासी वापर केलेला नाही. तेथे समोर दुकान व मागे रहिवासी वापर केला जात आहे. त्यामुळे सारा माफी करता येणार नाही. या ठिकाणी अंशतः वाणिज्यिक वापर केलेला असल्यामुळे सारा माफी करता येणार नाही. एमएलआरसी लागू होण्यापूर्वी सारा माफी होती. मात्र त्यांनी कागदपत्रे न दिल्यामुळे सारा माफी दिलेली नाही.

समितीने अशी विचारणा केली की, पेण तालुक्यात अशा प्रकारे सूट दिलेली होती. मात्र प्रत्यक्षात सूट दिली आहे की, नाही याचा उल्लेख केलेला नाही. सन २००५ मध्ये १२,८५,०२० रूपये एवढी रक्कम वसूल करण्याबाबत विभागाने नोटीस दिलेली होती. मात्र अद्याप वसुली झाल्याचे दिसत नाही. या संदर्भात शासनाचे निश्चित धोरण काय आहे ? सूट द्यावयाची नसल्यास वसुली झाली पाहिजे. हे प्रकरण सन २००५ मधील असल्यामुळे लवकर निर्णय झाला पाहिजे. १० वर्षे होऊनही कार्यवाही झालेली नाही. या संदर्भात संबंधितांना जबाबदार धरणे आवश्यक आहे. या संदर्भात आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली ते समितीला सांगा.

त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या ठिकाणी पेणचा उल्लेख केलेला आहे. सिव्हील अपील क्र. १०८/१९९० सेकंड ॲडीशनल डिस्ट्रीक्ट जज, रायगड यांनी केवळ पेण प्रकरणात रक्कम वगळण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे हा निर्णय सर्वत्र लागू करता येणार नाही. वाणिज्यिक वापराकरिता सूट दिली जात नाही. सदर प्रकरणात वसुली करणे आवश्यक आहे. तशा प्रकारचा बदल करण्याची शासनाची भूमिका नाही. यामुळे संबंधित क्षेत्रीय अधिका-यांना वसुली करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सदनात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला असता

मंत्री महोदयांनी नोंद घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. या करिता कायद्यामध्ये सुधारणा करून सारा माफ करण्याची मागणी केली होती. गावठाणातील रहिवासी वापराकरिता सारामाफी केली जाते. मात्र वाणिज्यिक वापरासाठी सारामाफी केली जात नाही. सदर प्रकरणात सारा वसुली करणे आवश्यक आहे. चालू आर्थिक वर्षात वसुली करण्याचे निदेश क्षेत्रीय अधिका-यांना दिले जातील.

समितीने अशी विचारणा केली की, १० वर्षे होऊन देखील अंमलबजावणी झालेली नाही. वसुलीची नोटीस दिलेली होती, तरी देखील वसुली का झाली नाही. कायद्यातील तरतूदीमध्ये बदल करण्याबाबत मागणी करण्यात आली होती त्या संदर्भात काय प्रयत्न केले गेले ? सध्याच्या नियमांची अंमलबजावणी करून सारा वसुली करावी किंवा धोरणात बदल तरी करावा.

त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वसुलीच्या संदर्भात आश्वासन दिलेले नव्हते. दि. ३१ मार्च २०१६ पर्यंत वसुली करण्याचे निदेश क्षेत्रीय अधिका-यांना दिले जातील. रहिवासी वापराकरिता सारा माफी दिली जाते. मात्र कोणत्याही वाणिज्यिक वापराकरिता सारा माफी दिली जात नाही. हे धोरण तसेच ठेवावे, त्यात बदल करु नये, असा निर्णय झालेला आहे. नोंद घेण्यात येईल. असे आश्वासन दिलेले असून शासनाची भूमिका मी विषद केलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, शासनाची भूमिका निश्चित करण्यापूर्वी या संदर्भात विभागाकडून काही प्रयत्न झाला होता काय ? गेल्या १० वर्षात या बाबत काहीच विचार झालेला नसल्याचे दिसून येत आहे. सदर आश्वासन पूर्ततेबाबत शासनाने काय केले ते समितीला सांगावे.

समितीने आपल्याला या ठिकाणी कलम १२३ मध्ये काय आहे, हे समजावण्याकरिता बोलाविलेले नाही. या संदर्भात नेमके काय घडले, त्यासंदर्भात शासनाची भूमिका काय होती ? हे सांगण्याकरिता आपल्याला आज येथे समितीसमोर बोलाविण्यात आलेले आहे.

यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, यासंदर्भात शासनाची भूमिका अशा स्वरूपाची असल्यामुळे त्यामध्ये बदल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सदरहू उत्तर शासनाच्या मान्यतेनेच समितीसमोर सादर केले जात आहे.

समितीने अशी विचारणा केली की, समितीसमोर येत असतांना प्रश्नांच्या उत्तराची वा साक्षीच्या विषयाची परिपूर्ण तयारी करून येणे अपेक्षित असते. कायदा बदलेपर्यंत जुन्या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. माननीय मंत्री महोदयांनी नोंद घेण्यात आलेली आहे, असे याबाबत जे उत्तर दिलेले आहे, त्याचा बोध होत नाही. नोंद घेण्यात आली आहे, याचा नेमका कोणता अर्थ अपेक्षित आहे ? आता या संदर्भात ॲकॅडॅमिक डिस्कशन चालू झालेले आहे. नुकसान झालेले आहे. हाच यामध्ये छोटासा प्रश्न आहे. यामध्ये समितीच्या सन्माननीय सदस्यांना शासनाच्या विभागाच्या कार्यवाहीला क्रॉस करण्याचा कोणताही हेतू नाही. या आश्वासनाची कोणीही दखल घेतलेली दिसून येत नाही. या आश्वासनावर सखोल चर्चा करून प्रशासनिक दृष्टीकोनाचे एक वलय सन्माननीय सदस्यांनी येथे उभे केलेले आहे. हे सर्व अभ्यासात्मक दृष्टीकोनातून व अनुभवातूनच साकार होते.

त्यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, शासनाच्या मान्यतेशिवाय समितीसमोर कोणत्याही प्रकारचे आश्वासन व त्यावरील कार्यपुर्तीचा अहवाल सादर केला जात नाही. शासनस्तरावर या संदर्भात विचार चालू आहे. खात्याच्या राज्यमंत्री महोदयांनी व मंत्री महोदयांनी या संदर्भात जे निर्णय घेतलेले आहेत, त्यानुसार कार्यवाही चालू आहे.

समितीने अशी विचारणा केली की, गेल्या दहा वर्षापासून या आश्वासनावर कार्यपूर्ती केली गेलेली नाही. दहा वर्षापूर्वी या आश्वासनाची नोंद घेण्यात आलेली नाही, हे योग्य नाही. दहा वर्षानंतरही याबाबत कोणत्याही स्तरावर चर्चा झाली नाही मग या आश्वासन समितीचा व आश्वासन पुर्तीच्या कार्यवाहीचा काहीही उपयोग नाही. सभागृहामध्ये औचित्याच्या मुद्दयावर बोलण्याकरिता उभे राहिल्यानंतर माननीय मंत्री महोदय नोंद घेण्यात आलेली आहे, असे आश्वासन देतात. या आश्वासनावर दहा वर्षे काहीही कार्यवाही केली जात नाही. होय किंवा नाही असे उत्तर दिले तरीही कार्यवाहीस सोपे जाते सभागृहामध्ये कोणत्याही प्रश्नावर उत्तर देत असतांना शासनाने जबाबदारीने उत्तर देणे आवश्यक आहे.

समितीचे अभिप्राय व शिफारशी :

''खालापूर तालुक्यातील खोपोली संदर्भात जमीन महसूल कायदा १९६६ बदलण्याबाबत'' या विषयावर सभागृहात श्री. देवेंद्र साटम, वि.स.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयावर मा.महसूल राज्यमंत्री यांनी ''याची नोंद घेण्यात येईल.'' असे आश्वासन दिले होते.

खोपोली गावठाण क्षेत्रातील काही व्यापारी घराच्या पुढील भागात व्यवसाय करून त्याच घरात मागील भागात रहात आहेत. तथापि, काही लोकांनी त्यांच्या घरातील गाळे भाड्याने दिलेले आहेत. तहसीलदार खालापूर यानी या ५२३ गाळेधारकांना नोटीसा बजावल्या असून त्यांचेकडून

सुमारे १२, ८५, ०२० इतकी रक्कम येणे अपेक्षित आहे. खोपोली नगर परिषद हद्दीतील ३३९ बांधकामे सर्वे नंबर मधील असून त्यानी अनधिकृत वाणिज्य वापर सुरू केला आहे. त्यामुळे सदरहू धारकांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ६७ तसेच ४५ मधील तरतुदी लागू होतात व अशा खातेदारांना बजावलेल्या नोटीसाप्रमाणे त्यांनी अकृषिक अकारणीची रक्कम भरणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे १२३ (अ) मध्ये शहरी भागातील रहिवासी वापराकरिता सारा माफी देण्याची तरतूद आहे. खालापूर तालुक्यातील भागात पूर्णपणे रहिवासी वापर केलेला नसून तेथे एका भागात दुकाने व त्या नंतरच्या मागील भागात रहिवासी वापर केल्यामुळे अशा ठिकाणी सारा माफी करता येणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम लागू होण्यापूर्वी सारामाफी करता येणार नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे १२३ (अ) होण्यापूर्वी सारा माफी होती. मात्र त्या संदर्भातील कागदपत्रे सदरचा अधिनियम लागू होण्यापूर्वी जमीनधारकाने सादर न केल्यामुळे त्यांना सारामाफी दिलेली नाही. या प्रकरणात एकूण रुपये १२,८५,०२० एवढी रक्कम वसूल करण्याबाबत विभागाने सन २००५ मध्ये संबंधितांना नोटीसा देऊनही अद्यापपर्यंत या बाबतची सारा वसुली संबंधित अधिका-यांनी केली नाही, ही वस्तुस्थितीदेखील समितीला प्राप्त झाली. या प्रकरणी विभागीय सचिवांनी संबंधितांना सारा वसुली करण्याबाबत सूचना दिल्या असल्याचे समितीला सांगितले आहे.

उपरोक्त माहिती विचारात घेता दिनांक ३१ मार्च २०१६ तारखेपर्यंत म्हणजेच विभागीय सचिवांची साक्ष होईपर्यंत सर्व सबंधितांकडून सारा वसुली करण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे व यासाठी संबंधित अधिका-यांनी सुमारे १० वर्षांपासून जास्त विलंब केला असल्याचेसुध्दा दिसून येते. संबंधित जागेवर वाणिज्यिक वापर त्याचप्रमाणे अधिनिवास वापरदेखील होत असल्याचे समितीसमोर आले आहे. निव्वळ तो निवासी असता तरी त्याबाबतची सारामाफीची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील नियमात आहे. तथापि, अधिनियमाच्या कलम १२३ मध्ये वाणिज्यिक वापराबरोबरच अधिनिवास वापर होत असल्यास त्याबाबतचा सारा वसूल करण्याची आवश्यकता असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. **सदरचा विषय सभागृहात २००५ मध्ये उपस्थित झाला होता. सदरची बाब उपस्थित झाल्यानंतर मा.महसूल राज्य मंत्री महोदयांनी या सारा वसूल करण्याबाबतची नोंद घेण्यात येईल असे आश्वासन सभागृहात दिले होते. सभागृहात मा.महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर त्या बाबतची कार्यवाही वेळीच होणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे. सदरचा प्रश्न हा सारा वसूल करण्याचा असून तो वसूल केल्यानंतर तो राज्याच्या तिजोरीत जमा होतो ही वस्तुस्थिती आहे. सदरची बाब ही आपण एका गावापुरती मर्यादीत न करता ती राज्यस्तरावर विचारात घेतल्यास अशा प्रकारच्या सारा वसुलीची अवैध प्रकरणे प्रलंबित असल्याचे नाकारता येणार नाही. त्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपये महसूल वसुलीविना प्रलंबित असण्याची शक्यता नाकारता येत नाही व सदरचा सारा वसूल करण्याची सर्व जबाबदारी ही सर्व संबंधित वसुली अधिका-यांची आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यात इतरत्रदेखील जागेचा वाणिज्यिक व निवासी वापर करणा-यांकडून सारा वसूल होतो किंवा कसे याबाबत परिपत्रकाद्वारे संबंधितांच्या निदर्शनास आणून देणे अगत्याचे असल्याचे समितीचे मत आहे. त्यानुसार शासनाने परिपत्रक निर्गमित करून वाणिज्यिक वापराबरोबरच निवासी जागेचा वापर होत असल्यास त्यांचेकडून महाराष्ट्र महसूल संहितेमध्ये नमूद असलेल्या तरतुदीनुसार सारा वसूल करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच मा.मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतर अशा आश्वासनांवर जे पाळणे सहज शक्य आहे त्यावर १० वर्षांपर्यंत त्यावर कारवाई न होणे ही निश्चितच गंभीर बाब आहे. असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे या प्रकरणात सन २००५ पासून सारा वसूल करण्याप्रकरणी जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील अशा सर्व अधिका-यांच्याविरुध्द चौकशी करून त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

महसूल व वन विभाग

सन २०१० च्या दुस-या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ४९५

विधानसभा कामकाज खंड - १५७, क्रमांक - ११, दिनांक २६ जुलै २०१०

''शेतकरी आत्महत्येसंदर्भात केंद्र सरकारच्या पंतप्रधान पॅकेज अंतर्गत होत असलेला भ्रष्टाचार,'' या विषयावर श्री. प्रकाश डहाके, वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा. महसूल मंत्री यांनी **''डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे. याबाबतीतील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.''** असे आश्वासन सभागृहात दिले होते.

विभागाने केलेल्या कारवाईत असे नमूद केले आहे की, विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी राज्य शासनाने

रु. १,०७५ कोटी व केंद्र सरकारने रु. ३,७५० कोटी इतक्या रकमेच्या घोषित केलेल्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाने डॉ. नरेंद्र जाधव यांची एकसदस्य समिती नेमली होती. शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी २००९ अन्वये समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने करावयाच्या विविध उपाययोजनांपैकी १३ उपाययोजनांच्या कार्यपुर्ती अहवालास मान्यता देण्यात आली व अन्य उपाययोजनांबाबत संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीस मंजुरी देण्यात आली. तसेच अहवालातील स्वीकृत शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. केंद्र सरकार व राज्य शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजेसची अनुक्रमे १५६% व १२८% अंमलबजावणी पूर्ण झाली आहे.

विभागाने केलेल्या कारवाईवर समितीचे समाधान न झाल्यामुळे तसेच आश्वासनाचा विषय शेतक-यांच्या पॅकेजचा व जिव्हाळ्याचा असल्याने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याबाबतचे निदेश दिले.

समितीने अशी विचारणा केली की, शेतकरी पॅकेजच्या वाटपामध्ये भ्रष्टाचार झाल्याची चौकशी झालेली आहे का ? याबाबत शासनास माहिती नसेल तर हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा. पुढील बैठकीला या विषयाच्या माहितीसह संबंधित विभागाने समितीसमोर साक्षीकरिता यावे. नागपूर येथे गाय वाटप झाले नाही. याबाबतची माहिती पशुसंवर्धन विभागाकडून माहिती मागवावी.

यावर विभागीय सचिवांनी माहिती दिली की, विधानसभेमध्ये व विधानपरिषदेमध्ये ज्यावेळी हे प्रश्न चर्चेला उपस्थित झाले होते, त्यावेळी यासंदर्भात विभागाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाली नव्हती. सदरहू पॅकेज वाटप उपक्रम राज्याच्या कृषी विभागाकडून राबविण्यात आला होता. शेतकरी आत्महत्येसंदर्भात एकूण दोन पॅकेजेस जाहीर करण्यात आले होते. एका पॅकेजमध्ये अनेक योजनांचा समावेश होता. यासंदर्भात ४६१ तक्रारी आलेल्या होत्या. या तक्रारी विविध विभागाशी निगडित होत्या. सहकार, सिंचन, पशुसंवर्धन, सामाजिक न्याय, अशा विविध विभागाशी या तक्रारी निगडित होत्या. डॉ. गोपाल रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभागासंदर्भातील भ्रष्टाचार व तक्रारीसंबंधी एक समिती नेमण्यात आली होती. ही समिती १३ डिसेंबर २००७ रोजी स्थापन झाली होती. या समितीने आपला अहवाल दिनांक १ सप्टेंबर २००८ रोजी शासनाला सादर केलेला आहे. तक्रारींचे स्वरूप गंभीर असल्यामुळे कृषी विभागातील अधिका-यांचीही या तक्रारींच्या निपटा-याकरिता समिती स्थापन करण्यात आली होती. याचा अहवाल दिनांक १५ एप्रिल २०११ रोजी शासनाला सादर केलेला आहे. राज्य शासनाला अहवाल सादर केल्यानंतर असे आढळून आले की, काही संबंधित अधिका-यांवर शंका होती. अशा सर्व अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. एकूण ४०५ प्रकरणांपैकी ३५१ अधिकारी होते. त्यापैकी ७० अधिका-यांनी कर्तव्य नीट बजावले नाही, असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यापैकी ६ कर्मचारी व ८ अधिका-यांना निलंबित केले गेले. एक अधिकारी इतर काही कारणामुळे या पूर्वीच निलंबित झालेला होता. तसेच ४ अधिकारी सेवानिवृत्त झाले होते. अशा प्रकारे एकूण १९ अधिका-यांवर कारवाई करून आरोप ठेवण्यात आले. ११ अधिकारी व ५ कर्मचा-यांवर कारवाई पूर्ण करण्यात आली. या सर्व कर्मचारी, अधिका-यांची एक किंवा दोन वेतनवाढ थांबवण्यात आली आहे. अद्याप चौकशी सुरू आहे. या करिता विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांना नियुक्त केले आहे. नियम ८ नुसार २२ अधिकारी व २९ कर्मचा-यांची विभागीय चौकशी सुरू आहे. ज्यांच्या किरकोळ चुका होत्या, त्यांची चौकशी पूर्ण झाली आहे. मात्र ज्यांच्यावर गंभीर आरोप ठेवण्यात आले होते, त्यांची चौकशी अद्याप सुरू आहे. विभागीय चौकशी अधिकारी हा महसूल विभागाचा असल्यामुळे ही चौकशी लवकर पूर्ण होण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. मात्र ५१ अधिका-यांची चौकशी असल्यामुळे कालावधी लागत आहे. आतापर्यंत हा अहवाल प्राप्त व्हावयास हवा होता.

काही ठिकाणी असे आढळून आले आहे की, गांडूळ खताचे शेड बांधण्यात आले मात्र त्याची प्रतवारी चांगली नव्हती किंवा काही ठिकाणी तर गांडूळ खताचे शेड नादुरुस्त होते. पॅकेजअंतर्गत शेतक-यांना पंप, पाईपलाईन, बैलगाडी दिली होती. ६० हजार शेतक-यांना १५० कोटी रुपयांचे संच पुरवण्यात आले. त्या बाबत तक्रारी प्राप्त झाल्या. त्या अनुषंगाने मार्केटींग फेडरेशन, एमएसआरडीसी, एमआयडीसी यांनी चौकशी केली. पुरवठादाराने सदोष पुरवठा केल्यामुळे संबंधितांवर कारवाई केली असून त्याचा समावेश काळ्या यादीत केला आहे. ज्या शेतक-यांकडे बैल नाही, त्यांना बैलगाडी देण्यात आली, अशा काही तक्रारी आल्या होत्या.

समितीने अशी विचारणा केली की, या ठिकाणी १५६ टक्के, १२८ टक्के पॅकेजची अंमलबजावणी झाल्याचे नमूद केले आहे. या बाबत खुलासा करावा.

यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, राज्य शासनाने १ हजार ७५ कोटी रुपयांचे पॅकेज दिले. मात्र काही ठिकाणी पॅकेजमध्ये तरतूद केली होती, त्यापेक्षा अधिक काम केले. पॅकेजमध्ये १०० कोटी रुपयांचे ॲलोकेशन केले होते. मात्र त्यापेक्षा अधिक काम झाले. राज्य शासनाने बियाणे वाटपाचा कार्यक्रम ३ वर्षासाठी घेतला होता. तो आता ५ वर्षासाठी करण्यात आला आहे. तसेच बियाणे वाटपाच्या कार्यक्रमाकरिता १८० कोटी रुपयांची तरतूद केली होती मात्र २१५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. अपेक्षित कामापेक्षा अधिकचे काम झालेले

आहे. १ हजार ७५ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. त्यापैकी १ हजार ८३ कोटी रुपये खर्च केले. अधिक रकमेचे काम झालेले आहे. राज्य शासनाने अधिक रक्कम दिल्यामुळे अधिक खर्च करण्यात आलेली आहे. पॅकेज अंतर्गत काही आयटम्स वाढवले व इरिगेशनकरिता अधिकची रक्कम दिली.

समितीने अशी विचारणा केली की, या संदर्भात अजून चौकशी सुरू आहे. ती कधी पूर्ण होईल ? सन २००५- २००६ मध्ये पॅकेज देण्यात आले होते. आता बरीच वर्षे झाली आहेत. या कालावधीमध्ये अधिकारी निवृत्त झाले तर त्यांच्यावर काय कारवाई केली जाते ?

यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या बाबत विभागाकडून सतत पाठपुरावा सुरू आहे. सन २०११ मध्ये चौकशी करण्यासाठी अधिका-याची नेमणूक केली. चौकशी अहवाल लवकरात लवकर ३ महिन्यात देण्याबाबत आम्ही महसूल विभागाच्या अधिका-यांना सूचना दिल्या आहेत. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करता येईल. नियम २७ नुसार, विभागीय चौकशी सुरू असल्यास संबंधित अधिकारी, कर्मचा-यांना ग्रॅच्युइटीची रक्कम मिळत नाही. त्यांना प्रोव्हीजनल पेन्शन मिळते व नंतर ती रक्कम वसूल करता येते. तसेच निवृत्त झाल्यानंतर दोन वर्षाच्या काळात विभागीय चौकशी करता येते. या सर्व प्रकरणात विभागीय चौकशी सुरू आहे.

समितीचे अभिप्राय व शिफारशी

''शेतकरी आत्महत्येसंदर्भात केंद्र सरकारच्या पंतप्रधान पॅकेज अंतर्गत होत असलेला भ्रष्टाचार'' या विषयावर श्री. प्रकाश डहाके, वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर मा. महसूल मंत्री यांनी **''डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या अहवालासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे. याबाबतीतील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.''** असे आश्वासन सभागृहात देण्यात आले होते.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी नमूद केले आहे की, सदरहू पॅकेज वाटप उपक्रम राज्याच्या कृषी विभागाकडून राबविण्यात आला होता. शेतकरी आत्महत्येसंदर्भात एकूण दोन पॅकेजेस जाहीर करण्यात आले होते. एका पॅकेजमध्ये अनेक योजनांचा समावेश होता. यासंदर्भात ४६१ तक्रारी आलेल्या होत्या या तक्रारी विविध विभागाशी निगडीत होत्या. डॉ. गोपाळ रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभागासंदर्भातील भ्रष्टाचार व तक्रारी संबंधी एक समिती नेमण्यात आली होती. ही समिती दिनांक १३ डिसेंबर २००७ रोजी स्थापन झाली होती. या समितीने आपला अहवाल दिनांक १ सप्टेंबर २००८ रोजी शासनाला सादर केलेला आहे. तक्रारीचे स्वरूप गंभीर असल्यामुळे कृषी विभागातील अधिका-यांचीही या तक्रारीच्या निपटा-याकरिता समिती स्थापन करण्यात आली होती. याचा अहवाल दिनांक १५ एप्रिल २०११ रोजी शासनाला सादर केलेला आहे. राज्य शासनाला अहवाल सादर केल्यानंतर असे आढळून आले की, काही संबंधित अधिका-यांवर शंका होती अशा सर्व अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. एकूण ४०५ प्रकरणापैकी ३५१ अधिकारी होते. त्यापैकी ७० अधिका-यांनी कर्तव्य नीट बजावले नाही, असा निष्कर्ष काढण्यात आला. त्यापैकी ६ कर्मचारी व ८ अधिका-यांना निलंबीत केले गेले. एक अधिकारी इतर काही कारणामुळे या पूर्वीच निलंबीत झालेला होता. तसेच ४ अधिकारी सेवानिवृत्त झाले होते. अशा प्रकारे एकूण १९ अधिका-यांवर कारवाई करून आरोप ठेवण्यात आले. ११ अधिकारी व ५ कर्मचा-यावर कारवाई पूर्ण करण्यात आली. या सर्व कर्मचारी, अधिका-यांची एक किंवा दोन वेतनवाढ थांबविण्यात आली आहे. अद्याप चौकशी सुरू आहे. या करिता विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती यांना नियुक्त केले आहे. विभागीय चौकशी अधिकारी हा महसूल विभागाचा असल्यामुळे ही चौकशी पूर्ण होण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. मात्र ५१ अधिका-यांची चौकशी असल्यामुळे कालावधी लागत आहे.

विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्यांचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी राज्य शासनाने रु.१०७५ कोटी व केंद्र सरकारने रु.३७५० कोटी इतक्या रकमेचे घोषित केलेल्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन करून राज्य शासनाने डॉ. नरेंद्र जाधव यांची एक सदस्य समिती नेमली होती. शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी २००९ अन्वये उक्त समितीने विविध उपाय योजनांपैकी १३ उपाय योजनेची कार्यपूर्ती अहवालास मान्यता देऊन संबंधित विभागाने करावयाच्या कार्यवाहीस मंजुरी देण्यात आली. केंद्र सरकार व राज्य शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजेसची अनुक्रमे १५६ % व १२८ % अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. सदर पॅकेजेसमध्ये नमूद केलेली रक्कम विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या प्रवण क्षेत्रात वापरण्याबाबत सुमारे ४६१ तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या विविध विभागाशी निगडीत होत्या. या तक्रारींमध्ये गैरव्यवहार व अनियमितता झाली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. तथापि, सन २००९ मध्ये सुमारे ४६१ तक्रारी प्राप्त होऊनही सन २०१६ पर्यंत या तक्रारींवर प्रशासनाद्वारे ठोस अशी कार्यवाही करण्यात आली नाही याबाबत समिती अतिव खेद व्यक्त करते.

नापिकी व कर्जबाजारी इत्यादी विविध कारणांनी शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे केंद्र व राज्य शासनाने शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी उपरोक्त नमूद केलेला निधी मंजूर केला आहे. या निधी व्यतिरिक्त शासनाने आणखी शिलकीचा निधी मंजूर करून खर्च केला असल्याचे सांगितले आहे. तथापि, गैरव्यवहारच्या एकूण ४०५ प्रकरणांपैकी ३५१ प्रकरणांमध्ये अधिकारी असल्याचे आणि त्या पैकी ७० अधिका-यांनी कर्तव्य नीट बजावले नसल्याचे निष्कर्ष चौकशी अधिका-यांनी काढले आहेत. त्यापैकी ६ कर्मचारी व ८ अधिका-यांना निलंबीत केले, १९ अधिका-यांवर कारवाई करून आरोप ठेवण्यात आले आहेत, ११ अधिकारी व ५ कर्मचा-यांवर कारवाई पूर्ण करण्यात आली. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) वर्तणूक ८ नियमानुसार २२ अधिकारी व २९ कर्मचा-यांची विभागीय चौकशी सुरू आहे. ज्यांच्या किरकोळ चुका होत्या त्यांची चौकशी पूर्ण झाली आहे. मात्र ज्यांच्यावर गंभीर आरोप आहेत त्यांची चौकशी अद्यापही सुरू असून सुमारे ५१ अधिका-यांची चौकशी सुरू असल्यामुळे या साठी कालावधी लागत आहे, असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

शासनाने दिलेल्या पॅकेजमध्ये अधिका-यांद्वारा गैरव्यवहार होणे ही अत्यंत दुर्दैवाची बाब असून अशा अधिका-यांना कोणत्याही परिस्थितीत माफ करु नये अशी समितीची भूमिका आहे. असे असतानादेखील महाराष्ट्र नागरी सेवा नियम ८ नुसार केवळ २२ अधिकारी व २९ कर्मचा-यांची विभागीय चौकशी सुरू असल्याचे समितीला सांगितले आहे. ४६१ तक्रारींमध्ये सुमारे ५१ अधिका-यांचीच चौकशी सुरू असल्याचे समितीला सांगितले आहे. यावरुन गैरव्यवहारात सामील असलेल्या अधिका-यांना शासनाद्वारा पाठीशी घालण्याचा दाट संशय समितीला येत असून या अधिका-यांच्या चौकशीस विलंब होणे म्हणजेच गुन्हेगाराला मोकळीक देणे असाच त्याचा अर्थ होत आहे. अशाप्रकारे आर्थिक अनियमितता करणा-या अधिका-यांवर कसलीही दया-माया न दाखवता त्यांचेविरुध्द कठोर कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

सबब, विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनाने दिलेल्या रकमेच्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीत ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप आहेत अशा सर्व अधिका-यांची चौकशी करण्यात अक्षम्य विलंब केल्यामुळे ते प्रशासनात चौकशी अधिका-यांवर या ना त्या कारणावरून दबाव आणू शकतात. सदर बाब या अधिका-यांनी गैरव्यवहार दाबून टाकण्याचा दाट संशय समितीला असल्यामुळे ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेविरद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमान्वये दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत अशा सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचा-यांची तातडीने चौकशी करून ते दोषी आढळल्यास त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

नगरविकास विभाग

सन २०११ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ९७५

विधानसभा कामकाज खंड १५९, क्रमांक २६, दिनांक २१ एप्रिल २०११.

विषय :-----**''राज्यातील निरनिराळ्या विभागातील गैरव्यवहार रोखण्यात शासनाला आलेले अपयश''** या विषयावरील सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांच्या प्रस्तावावर मा.मुख्यमंत्री यांनी ''**अधिकार नसताना चुकीचे परिपत्रक काढल्याबाबत व त्या आधारे वेगवेगळ्या इमारतींना मंजुरी प्रदान केल्याबाबत जी तक्रार आहे, त्याबाबत सविस्तर चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येईल.''** असे आश्वासन दिले होते.

विभागाने केलेल्या कारवाईत असे नमुद केले आहे की, या बाबत चौकशी करून आढळलेल्या अनियमिततेबाबत संबंधितांचे खुलासे घेऊन आवश्यकतर त्यांची विभागीय चौकशी करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत महानगरपालिकेच्या स्तरावर अंतर्गतरित्या निर्गमित करण्यात आलेल्या सर्व परिपत्रकांचा आढावा व तपासणी करून विकास नियंत्रण नियमावलीतील मंजूर तरतुदींच्या विसंगत सर्व परिपत्रके त्वरित रद्द करण्याबाबत ही पुणे महानगरपालिका आयुक्तांना निदेश देण्यात आलेले आहेत.

विभागाने केलेल्या कार्यवाहीवर समितीचे समाधान न झाल्याने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे निश्चित केले.

समितीने विचारणा केली की, राज्यातील निरनिराळ्या विभागातील गैरव्यवहार रोखण्यात शासनाला आलेले अपयश, या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते त्याची पूर्तता केली आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी उपरोक्त विषयाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना असे आश्वासन दिले होते की, अधिकार नसताना चुकीचे परिपत्रक काढल्याबाबत व त्या आधारे वेगवेगळ्या इमारतींना मंजुरी प्रदान केल्याबाबत जी तक्रार आहे त्या बाबत सविस्तर चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येईल. या अनुषंगाने सांगतो की, या विषयाची चौकशी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. त्या समितीने या विषयाचा पूर्ण अभ्यास केला. त्या समितीच्या असे निदर्शनास आले की, जे परिपत्रक काढण्यात आले होते ते रद्द करावयास पाहिजे होते. समितीच्या शिफारशीनुसार पुणे महानगरपालिकेने ते परिपत्रक रद्द केले. तसेच समितीने असाही निष्कर्ष काढला होता की, जी प्रकरणे घडली ती अनियमिततेच्या स्वरूपाची नव्हती. त्यामुळे तत्संबंधी पुढील कारवाई केली नाही.

समितीने विचारणा केली की, चुकीचे परिपत्रक काढणा-या अधिका-यांवर काय कारवाई केली ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सदरहू परिपत्रक तत्कालीन शहर अभियंत्यांनी काढले होते. त्यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे यांनी त्यांची चौकशी केली होती. चौकशीअंती या विषयी कसल्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही असा निष्कर्ष संबंधित चौकशी समितीने काढला.

समितीने विचारणा केली की, शहर अभियंत्यांना परिपत्रक काढण्याचा अधिकार आहे काय ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, त्या परिपत्रकाच्या आधारे कोणालाही वाढीव एफएसआय सारख्या गोष्टींचा फायदा करून दिलेला नव्हता. साईड मार्जीनमध्ये रॅम देण्याबाबतचे एक प्रकरण होते. समितीला चौकशीमध्ये असे निदर्शनास आले की, रॅम देऊ नये अशा प्रकारची विशिष्ट तरतूद अधिनियमात नव्हती. त्यामुळे या सर्व बाबींची शहानिशा करून अधिनियमात ज्या सुधारणा करणे आवश्यक होते त्या सुधारणा शासनाने नंतर केल्या आहेत.

समितीने विचारणा केली की, संबंधित अधिका-यांनी मार्गदर्शक सूचनांच्या पलीकडे जाऊन परिपत्रक काढले. वास्तविक पाहता त्या अधिका-याला परिपत्रक काढण्याचा अधिकार नव्हता. त्यांनी चुकीचे परिपत्रक काढून सुद्धा आपण सांगत आहात की, यामध्ये अनियमितता झालेली नाही. मुळात चुकीचे परिपत्रक काढले हीच एकप्रकारे अनियमितता झालेली आहे. शासनाने दिनांक ८ जून २०१२ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने निर्गमित केलेली दिनांक ७ जानेवारी २००५ व दिनांक १६ एप्रिल २०१० ही दोन्ही परिपत्रके ताबडतोब रद्द करण्याचे कळविले होते.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय, ती परिपत्रके विसंगत असल्यामुळेच ती रद्द केली आहेत. सुरुवातीला २००५ मध्ये परिपत्रक काढण्यात आले होते. त्यानंतर २००८ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या पार्कींग आणि इमारतीच्या उंची संबंधीचे नियम शासनाने एका वेगळ्या प्रकरणात मान्य करून दिले. त्यामुळे ही विसंगती निर्माण झाली. ही विसंगती निर्माण झाल्यामुळे जुने परिपत्रक रद्द करणे आवश्यक होते. तशा प्रकारच्या सूचना शासनाने दिल्या आणि नंतर ते परिपत्रक रद्द झाले. हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर या विषयी पूर्ण चौकशी करण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांना देण्यात आले. चौकशीमध्ये आढळून आलेले निष्कर्ष त्यांनी शासनाला कळविलेले आहेत.

समितीने विचारणा केली की, ते निष्कर्ष चुकीचे आहेत काय ? परिपत्रक ओव्हररुल झाल्यामुळेच ते परिपत्रक रद्द करावे लागले, शिवाय मूळ परिपत्रक का काढावे लागले आणि ते रद्द का करावे लागले याबाबतची सुद्धा माहिती सादर करावी.

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, होय, चौकशी समितीने काढलेले निष्कर्ष चुकीचे आहेत असे समितीला वाटत असले तर त्या निष्कर्षाची शासन स्तरावर शहानिशा करण्यात येईल.

समितीचे अभिप्राय व शिफारशी :

''राज्यातील निरनिराळ्या विभागातील गैरव्यवहार रोखण्यात शासनाला आलेले अपयश'' या विषयावरील सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांच्या प्रस्तावावर मा. मुख्यमंत्री यांनी **''अधिकार नसताना चुकीचे परिपत्रक काढल्याबाबत व त्या आधारे वेगवेगळ्या इमारतींना मंजूरी प्रदान केल्याबाबत जी तक्रार आहे, त्याबाबत सविस्तर चौकशी करून पुढील कारवाई करण्यात येईल.''** असे आश्वासन देण्यात आले आहे.

विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी स्पष्ट केले की, सदर विषयाची चौकशी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. त्या समितीने या विषयाचा अभ्यास केला. त्या समितीच्या असे निदर्शनास आले की, जे

परिपत्रक काढण्यात आले होते ते रद्द करावयास पाहिजे होते. समितीच्या शिफारशीनुसार पुणे महानगरपालिकेने ते रद्द केले. तसेच समितीने असाही निष्कर्ष काढला होता की, जी प्रकरणे घडली ती अनियमिततेच्या स्वरूपाची नव्हती. त्यामुळे तत्संबंधी पुढील कारवाई केली नाही.

संबंधित अधिका-यांनी मार्गदर्शक सूचनांच्या पलिकडे जाऊन परिपत्रक काढले. वास्तविक पाहता त्या अधिका-याला परिपत्रक काढण्याचा अधिकार नव्हता. त्यानी चुकीचे परिपत्रक काढून एक प्रकारे अनियमितताच केलेली आहे. त्यामुळे समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करते. याबाबत समिती अशी शिफारस करते की, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने ''जी प्रकरणे घडली ती अनियमिततेच्या स्वरूपाची नव्हती'' असा निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे तत्ससंबंधी त्यानी पुढील कारवाई केली नाही. तथापि, सदर परिपत्रक रद्द करावे लागले, शिवाय मूळ परिपत्रक का काढावे लागले व ते रद्द का करावे लागले याबाबतची माहिती तसेच उक्त समितीने काढलेल्या निष्कर्षाची शासन स्तरावर शहानिशा करण्यात यावी याप्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिका-याविरुद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

सन २०१२ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ५६८

विधानसभा कामकाज खंड - १६२, पृ.क्र. १७, दिनांक ११ एप्रिल २०१२

विषय :-----**''परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये ७ कोटी ४४ लक्ष ८२ हजार रुपयांचा अपहार झाल्याबाबत''** सर्वश्री. संजय सावकारे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७१३७१ ला उत्तर देतांना मा. गृह मंत्री यांनी **''अशा प्रकारच्या गुन्ह्याची पुनर्रावृत्ती होऊ नये या करीता बँकेमधून कोणाला विमा उतरावयाचा असल्यास सदर कंपनी अधिकृत आहे की नाही याची तपासणी करण्याची सुचना केली जाईल.''** असे आश्वासन दिले होते.

विभागाने केलेल्या कारवाईत नमुद केले आहे की, दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणी यांनी जिल्ह्यामधील प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था /पगारदार संस्थांच्या सभासदांचा विमा / आयुकेअर कंपनीकडून उतरविलेला होता. आयुकेअर कंपनीने विमा प्रिमियमची रक्कम बँकेस परत केली. कंपनीने जमा केलेली रक्कम बँकेने संस्थाच्या खाती जमा केली आहे. तसेच या पुढे विमा उतरविताना विमा कंपनी अधिकृत आहे कि नाही. याची खात्री करूनच विमा उतरविण्यात यावा अशा सुचना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित परभणी यांना देण्यात आलेल्या आहेत.

विभागाने केलेल्या कार्यवाहीवर शासनाचे समाधान न झाल्यामुळे व उपरोक्त आश्वासन बँकेतील अपहाराबाबत असल्याने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याबाबत निदेश दिले. यावर समितीने विभागीय सचिवांकडे याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सदरील प्रकरणी बँकेस सूचना देण्यात आली होती की, यापुढे विमा उतरविताना विमा कंपनी अधिकृत आहे की नाही, याची खात्री करूनच विमा उतरविण्यात यावा. त्यासंदर्भात बँकेने अशा प्रकारची चुक भविष्यात होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. तसेच यापुढे विमा कंपनी योग्य असल्याची खात्री करून विमा उतरविण्यात येईल असे कळविले आहे.

समितीने अशी विचारणा केली की, बँकेने विमा कंपनी योग्य आहे की नाही. याची तपासणी न करता त्यांच्याकडून विमा उतरविला होता सदरहू बँकेस एखादा सर्वसाधारण व्यक्ती जाऊन भेटला असता व त्याने सांगितले असते की, माझी विमा कंपनी असून मी त्या कंपनीचा मालक आहे, तरी बँकेने विमा उतरविला असता बँकेला जी सूचना देण्यात आली आहे त्याचा अर्थ असा आहे काय की, तुम्ही जेवढा गैरव्यवहार किंवा चोरी करावयाची आहे ती करा, परंतु भविष्यात असे करू नका. सदरहू रक्कम कधी जमा करण्यात आली ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, सदरील बँकेने विम्याच्या प्रिमिअमकरिता ७ कोटी ३९ लाख रुपये औरंगाबादच्या प्रायव्हेट लिमिटेड विमा कंपनीस दिले होते. सदरहू रक्कम संबंधित कंपनीने बँकेस परत केली आहे. संबंधित कंपनीस विम्यापोटी माहे फेब्रुवारी व एप्रिल, २०११ मध्ये प्रिमिअम देण्यात आला होता. तसेच, माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०११ व माहे जानेवारी, २०१२ मध्ये सदरहू रक्कम विमा कंपनीने जमा केली.

समितीने अशी विचारणा केली की, संबंधित कंपनीने व्याजासह पैसे परत केले का ? विम्यापोटी द्यावयाच्या रकमेबाबत बँकेच्या संचालक मंडळाने ठराव घेतला होता का ? संचालक मंडळाने विमा कंपनीची शहानिशा न करता त्यांना रक्कम प्रदान केली होती. त्याबाबत त्यांच्यावर

कोणती कारवाई प्रस्तावित करण्यात आली होती ? कलम ८३ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले होते व त्याच्या आधारे संचालक मंडळावर कारवाई करणे आवश्यक होते.

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, सदर प्रकरणी कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्यात आली होती. सदरील चौकशीमध्ये कोणावरही जबाबदारी फिक्स न केल्यामुळे कलम ८८ अंतर्गत जबाबदारी फिक्स करण्याचे कारण नव्हते. कलम ८३ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये संचालक मंडळास जबाबदार धरण्यात आले नव्हते. सदरहू विमा कंपनीस विम्याचे काम दिल्यानंतर बँकेतील ६ संचालकांनी तक्रार केली होती की, विमा कंपनी सोबत करण्यात येणारा व्यवहार चुकीचा आहे. त्या अनुषंगाने चौकशी केली असता करण्यात आलेली कार्यवाही चुकीची होती व त्यानंतर विमा कंपनीने पैसे परत केले होते. कलम ८३ अंतर्गत केलेल्या चौकशीत गैरप्रकार समोर आला नसून बँकेच्या संचालकांनी केलेल्या तक्रारीतून निदर्शनास आला. त्यानंतर संबंधिताकडून पैशांची वसुली करण्यात आली. त्यानंतर बँकेच्या नुकसानीपोटी जबाबदारी कायम करण्याच्या दृष्टीकोनातून कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्यात आली. त्यामध्ये बँकेचे संचालक मंडळ किंवा अधिकारी यांना जबाबदार धरण्यात आले नाही. त्यामुळे कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्यात आली नाही.

समितीने अशी विचारणा केली की, सदर प्रकरणी मी कलम ८३ अंतर्गत कारवाई बाबत बोलत आहे. संचालकांनी तक्रार नोंदवली हे ठीक आहे परंतु ज्या संचालकांनी सदरील व्यवहारास मान्यता दिली होती त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होती. कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिका-यांनी संचालक मंडळास जबाबदार धरले नाही. ही बाब शासनास मान्य आहे काय ? शासनाने कलम ८३ नुसार समिती नेमली. त्या अधिका-यांनी चौकशी करून सांगितले की, कारवाई करण्याची गरज नाही किंवा संचालकांना दोषी धरले नाही, हे शासनाला मान्य आहे काय ? कारण शेवटी ही शासनाने नेमलेली समिती आहे, ती शासनाकडेच आपला अहवाल देणार ना ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, कलम ८३ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल निबंधकांकडे जातो.

समितीने अशी विचारणा केली की, अधिका-यांनी बँकेच्या संचालकांना दोषी धरले नाही, हा अहवाल शासनाला मान्य आहे काय ? अधिका-यांनीच ही चौकशी केलेली आहे. चौकशी अधिकारी कोण होते ? भ्रष्टाचार दूर करणे ही शासनाची जबाबदारी आहे. शासनाने समिती नेमली नाही असे म्हणता तर चौकशीकरिता अधिकारी तरी शासनानेच नेमले ना, मग त्यांचा अहवाल शासनाला मान्य आहे की नाही, चौकशीकरिता अधिकारी कोणी नेमले ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, शासनाने समिती नेमलेली नाही. विभागीय निबंधकांनी कलम ८३ अन्वयेच्या चौकशीसाठी अधिका-यांची नेमणूक केली होती. त्या अधिका-यांचा अहवाल विभागीय निबंधकांनीच स्वीकारलेला आहे. शासनाच्या पातळीवर तो प्राप्त झाला नाही. या संबंधीचा निर्णय विभागीय निबंधकांच्या पातळीवरचा होता. या जिल्हा मध्यवर्ती बँकेचे निबंधक हे विभागीय निबंधक औरंगाबाद आहेत. त्यांनी कलम ८३ अन्वये चौकशी अधिका-यांची नेमणूक केली होती. कलम ८३ अन्वये चौकशी केलेल्या अधिका-यांनी जो निर्णय दिला तो या विभागीय निबंधकांनीच स्वीकारला त्यामुळे पुढची कारवाई करण्यात आलेली नाही. विभागीय निबंधकांनी जो निर्णय घेतला, त्या संदर्भातील कागदपत्रे तपासून याबाबतीतील शासनाचे म्हणणे सादर केले जाईल. विभागीय निबंधकांची कागदपत्रे मी पाहिलेली नाहीत, त्यामुळे आता मला याबाबत काही सांगता येणार नाही.

समितीने अशी विचारणा केली की, शासन याचे उत्तर देऊ शकत नाही का ? आपण ती माहिती घ्यावी. तोपर्यंत हे आश्वासन राखून ठेवू. एका संचालकांनी विमा अपहाराच्या संदर्भात तक्रार केल्यानंतर चौकशी अधिकारी नेमले. त्यांच्या अहवालात जरी ते दोषी आढळले नसले तरी, त्यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आलेला असल्याने यामध्ये काही तरी तथ्य असेलच ना ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, विभागीय निबंधकानी ज्या कागदपत्रांच्या आधारे चौकशी अहवाल सादर केला, ती पाहून याबाबतची माहिती मी पुढच्या वेळेस सांगेन.

समितीने अशी विचारणा केली की, ती कागदपत्रे आतापर्यंत का पाहिली नाहीत ? एखाद्या अधिका-याने चौकशी अधिकारी नेमल्यास त्याबाबतचे अधिकार त्यांच्याकडे असतात. मात्र जर याबाबतीत वरच्या पातळीवर अपील झाले तर, पुढचा विषय उपस्थित होतो. या प्रकरणात वरच्या पातळीवर अपील केले नाही, म्हणून हे प्रकरण तेथेच राहिले असे यावरून दिसते. आपण याबाबतीतील माहिती घ्यावी व ती पुढच्या वेळेस सांगावी. या आश्वासनाबाबतची माहिती देण्याकरिता वेळ दिलेला असतानाही आपण संबंधित कागदपत्रे पाहिली नाहीत. त्यामुळे याबाबतीत शासनाने फार दुर्लक्ष केलेले दिसते. याबाबतीत एवढे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, अशा प्रकारच्या गुन्ह्यांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता बँकेमधून कोणाला विमा उतरवायचा असल्यास सदर कंपनी अधिकृत आहे की नाही, याची तपासणी करण्याची सूचना केली जाईल या आश्वासनाच्या अनुषंगाने मी माहिती घेऊन आलो होतो. त्याप्रमाणे यापुढे विमा उतरविताना विमा कंपनी अधिकृत आहे की नाही याची खात्री करूनच विमा उतरविण्यात यावा अशा सूचना बँकेला दिलेल्या आहेत. बँकेने त्या सूचना स्वीकारल्या असून लेखी पत्र पाठविले आहे की, भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घेऊ आता आपण विचारलेली माहिती मी पुढच्या बैठकीत सांगेल.

समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणात गैरव्यवहार केला म्हणूनच गुन्हे दाखल केलेले आहेत. असे असताना आतापर्यंत याबाबतची तपासणी का केली नाही, एवढी दिरंगाई या कामात का केली ? हे प्रकरण किती सालातील आहे ? संचालक मंडळाचा कालावधी संपण्याची वाट पाहात होता काय, अधिकारी सेवानिवृत्त होण्याची वाट पाहता होता काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे उत्तर दिले की, या प्रकरणी दिरंगाई केलेली नाही. कलम ८३ नुसार चौकशी केली आहे. सन २०१२ मधील हे प्रकरण आहे. या प्रकरणात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच आयुकेअर विमा कंपनीच्या कार्यकारी संचालकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ज्या प्रकरणात बँकेचे नुकसान होते, अशा प्रकरणात कलम ८८ नुसार कारवाई होते. या प्रकरणात प्रिमियमपोटी भरलेले ७ कोटी ४१ लाख रुपये बँकेला परत मिळाले आहेत. विभागीय निबंधकांनी ज्या कागदपत्रांच्या आधारे हा निर्णय घेतला, त्याची माहिती घेऊन मी ती समितीला सांगेन.

समितीने अशी विचारणा केली की, त्या अधिका-यांनी जे केले त्याप्रमाणे शासनाने हा गैरव्यवहार झाकण्यासाठी मदत केली असे म्हटले तर ते वावगे ठरू नये असे म्हणावेसे वाटते. यावर आपले काय म्हणणे आहे. जॉईंट रजिस्ट्रारनी चौकशी केली तर, असेच होणार, आमचे असे मत आहे की, आपण सहकार आयुक्त आहात आपण याचे स्पेशल ऑडिट केले, तर यातील तथ्य बाहेर येऊ शकते. समितीपुढे हे प्रकरण आल्यानंतर त्याची चौकशी करायची, हे आपल्याला तरी पटण्यासारखे आहे काय ? जॉईंट रजिस्ट्रारचे सर्व रिपोर्ट्स आपण मागवून घ्यावेत. त्यांनी कशाच्या आधारावर निर्णय घेतला ते पहावे. त्यांनी काही चुकीचे केल्याचे आपल्या निदर्शनास आल्यास आपल्याला त्यांच्या विरुध्द ॲक्शन घ्यावी लागेल. मंगळवार, दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी या संदर्भात आपली पुन्हा साक्ष घेण्यात येईल.

दिनांक २ फेब्रुवारी २०१६ रोजी झालेल्या विभागीय साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी असे सांगितले की, या आश्वासनाच्या बाबतीत मागच्या बैठकीत अहवाल मांडावयाचा आहे असे सांगण्यात आले होते. बँकेच्या व्याजाचे जे नुकसान झालेले आहे तो मुद्दा कलम ८३ च्या चौकशीत विचारात घेण्यात आला नव्हता. मागच्या बैठकीमध्ये कलम ८३ अन्वयेचा अहवाल स्वीकारण्यात आला होता. त्यानुसार बँकेचे ९ महिन्यांच्या व्याजाचे नुकसान झालेले आहे ते नेमके किती झालेले आहे याची चौकशी करण्यासाठी सदर व्यवहाराचे लेखा परीक्षण करून ती व्याजाची रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हा विशेष लेखा परीक्षक, सहकारी संस्था, परभणी यांची दिनांक २९ जानेवारी, २०१६ च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात येईल.

समितीने अशी विचारणा केली की, हे प्रकरण सन २०१२ पासूनचे आहे. गेल्या तीन चार वर्षात आपण काय कार्यवाही केली आहे. जेवढा निधी प्रिमियम म्हणून ठेवला तो परत आला. पुन्हा असा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, कलम ८३ चा अहवाल स्वीकारला आहे. त्या बाबतीत विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांच्या पातळीवरून चौकशी अधिकारी नेमण्यात आले आहेत. चौकशी अधिका-यांनी त्यांचा अहवाल दिला आणि बँकेमध्ये ७.५० कोटी रुपये सुमारे ९ महिने बँकेमध्ये राहिले असल्याचे निष्पन्न झाले आहे. या रकमेसंबंधी ऑडीट करून झालेल्या नुकसानीची चौकशी करण्यात येईल. परंतु यासंबंधी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. बँकेच्या या नुकसानीसंबंधी चौकशी अधिकारी यांच्या ही बाब निदर्शनास आली नव्हती काय ? आयुक्त महोदय ती विमा कंपनी फ्रॉड होती हे निदर्शनास आल्यावर त्यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. त्यावेळच्या शासकीय अधिका-यांनी कोणती कार्यवाही केली.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सागोत्रे नावाचे विभागीय उप निबंधक त्या पदावर कार्यरत होते. दीड महिन्यापूर्वी पदावर कार्यरत असताना ते मयत झाले आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये या अपहाराबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, जी रक्कम गुंतविण्यात आली होती ती परत मिळाली आहे काय, यामध्ये प्रश्न असा आहे की, जी विमा कंपनी आहे ती बोगस आहे असे दाखविले असले तरी बँकेने पैसा दिलेला आहे. त्यामुळे बँकेच्या व्याजाचे नुकसान होता कामा नये. यामध्ये एक समाधानाची गोष्ट अशी आहे की, त्या विमा कंपनीकडील पैसे परत आले आहेत. अशा प्रकारच्या बोगस कंपन्यांना प्रतिबंध घालण्यासाठी आपण सहकार विभागाच्या वतीने कोणते धोरण स्वीकारणार आहात. यासंबंधी आपण जे सांगत आहात ती रुटिन प्रक्रिया आहे. तथापि, याला पायबंद घालण्यासाठी मी मागच्या बैठकीत सुद्धा सूचित केले होते की, या

प्रकरणांमध्ये शासनाने ओरिएन्टल इन्श्यूरन्स आणि दुस-या एका कंपनीला ऑथराईज्ड केलेले आहे. त्यामुळे अशाच कंपन्यांचा विमा घेण्यासंबंधी काही धोरणात्मक निर्णय घेण्यात आला पाहिजे. निमंत्रित सदस्य बैठकीस बसतो त्यावेळी तो शासनाचा प्रतिनिधी असतो. आपण त्यावेळी सर्वसंमतीने ठराव पारित केला असे म्हणतो. संबंधित अधिका-यांची जबाबदारी असते की, त्यांनी तेथे मत द्यावे. तसे मत देणे गरजेचे आहे. आपण संचालकांना एक मिनिटात चोर म्हणतो. त्यामुळे याचाही विचार केला पाहिजे.

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, यासंबंधी एफआयआर दाखल करण्यात आला आहे आणि विमाधारकांची मूळ रक्कम सदर कंपनीने परत केलेली आहे. आपण यासंबंधी कलम ८३ अन्वये चौकशी करून कार्यवाही करतो. शासनाच्या वतीने जे डीडीआर बँकांवर, संस्थांवर शासकीय प्रतिनिधी म्हणून काम करतात, त्यांनी जेव्हा विषय चर्चेला येतो आणि तेथे नियमाप्रमाणे काम चालत नसेल तर स्वतःचे मत दिले पाहिजे अशा सूचना शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात येतील.

समितीचे अभिप्राय व शिफारशी :

''परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये ७ कोटी ४४ लक्ष ८२ हजार रुपयांचा अपहार झाल्याबाबत'' या विषयावरील सर्वश्री संजय सावकारे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक- ७१३७३ ला उत्तर देताना मा.गृह मंत्री यांनी ''अशा प्रकारच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता बँकेमधून कोणाला विमा उतरावयाचा असल्यास सदर कंपनी अधिकृत आहे की नाही याची तपासणी करण्याची सूचना केली जाईल.'' असे आश्वासन दिले होते.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ७,४४,८२,००० रुपयांचा अपहार झाल्याबाबत सर्वश्री संजय सावकारे व इतर वि.स.स. यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला मा.गृह मंत्री यांनी ''अशा प्रकारच्या गुन्ह्याची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता बँकेमधून कोणालाही विमा उतरावयाचा असल्यास सदर कंपनी अधिकृत आहे की नाही याची तपासणी करण्याच्या सूचना केल्या जाईल'' असे आश्वासन दिनांक ११ एप्रिल २०१२ रोजी सभागृहात दिले होते.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी यांनी जिल्ह्यामधील विविध कार्यकारी सेवा संस्था, पगारदार संस्थांच्या सभासदांचा विमा, आयु केअर कंपनीकडून उतरविला होता. आयु केअर कंपनीने विमा कंपनीची रक्कम बँकेस परत केली, कंपनीने जमा केलेली रक्कम बँकेने संस्थांच्या खाती जमा केलेली आहे. तसेच यापुढे विमा उतरविताना विमा कंपनी अधिकृत आहे किंवा नाही याची खात्री करूनच विमा उतरविण्यात यावा अशा सूचना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, परभणी यांना दिलेल्या आहेत असे विभागाने समितीला पाठविलेल्या लेखी माहितीत नमूद केले आहे. विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीचे समाधान न झाल्याने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीमध्ये बँकेने विमा कंपनी अस्तित्वात आहे किंवा कसे याची तपासणी न करताच उक्त कंपनीचा विमा उतरविणे योग्य आहे काय? सदरहू कंपनीने व्याजासह पैसे परत केले आहेत काय? विम्यापोटी ठेवावयाच्या रकमेबाबत बँकेच्या संचालक मंडळाने ठराव घेतला होता का? संचालक मंडळाने विमा कंपनीची शहानिशा न करता त्यांना प्रदान केली होती त्यांच्याबाबत त्यांच्यावर कोणती कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली? महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ अन्वये करण्यात आलेली चौकशी अन्वये गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येऊनही संचालक मंडळावर कारवाई का करण्यात आली नाही? इत्यादी प्रश्न उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी समितीला असे सांगितले की, उपरोक्त नमूद केलेल्या अधिनियमाच्या कलम ८३ अंतर्गत कोणावरही जबाबदारी निश्चित केली नव्हती त्यामुळे कलम ८८ अंतर्गत जबाबदारी निश्चित करण्याचे कारण नव्हते. कलम ८३ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये संचालक मंडळातील ६ संचालकांनी तक्रार केली होती. बँकेने विमा कंपनीसोबत केलेला व्यवहार चुकीचा असल्यामुळे विमा कंपनीने बँकेस रक्कम परत केली आहे. त्यामध्ये बँकेचे संचालक मंडळ किंवा अधिकारी यांना जबाबदार धरण्यात आले नाही. म्हणूनच कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्यात आली नाही असे समितीस विदित केले. सदरची चौकशी विभागीय निबंधकांनी कलम ८३ अन्वये चौकशी अधिका-यांची नेमणूक करून केली होती. चौकशी अधिका-यांनी जो निर्णय दिला तो विभागीय निबंधकांनी स्वीकारला. त्यामुळे पुढची कार्यवाही करण्यात आली नाही. विभागीय निबंधकांनी जो निर्णय घेतला त्या संदर्भातील कागदपत्रे तपासून या बाबतीतील शासनाचे म्हणणे सादर केले जाईल. सदरचे विभागीय निबंधक हे मयत झाले. या प्रकरणात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच आयु केअर विमा कंपनीच्या संचालकांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे असेही समितीस विभागीय सचिवांनी विदित केले.

उपरोक्त माहिती विचारात घेता परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रुपये ७,४४,८२,००० इतकी रक्कम आयु केअर या विमा कंपनीस प्रिमियमपोटी दिली होती. सदरच्या रकमेपैकी रुपये ७,४१,००,००० बँकेला परत मिळालेले आहेत. याचाच अर्थ सदरची रक्कम बँकेने नियमबाह्यपणे आयु केअर कंपनी अस्तित्वात नसतानादेखील त्या कंपनीचा विमा उतरवून बँकेच्या भागधारकांची व ग्राहकांची फसवणूक केली

असे समितीचे ठाम मत आहे. या प्रकरणात आयु केअर विमा कंपनीने केवळ ७,४१,००,००० रुपये बँकेला परत केले असून सदरची रक्कम बँकेत केंव्हा जमा केली याचा उल्लेख विभागीय सचिवांनी साक्षीत त्याचप्रमाणे समितीला लेखी स्वरूपात पाठविलेल्या माहितीत नमूद केलेला नाही. त्यामुळे या रकमेवरील व्याजाचा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. सदरचे व्याज सर्व संबंधितांकडून आजच्या तारखेपर्यंत अस्तित्वात असलेल्या व्याजाच्या दराने वसूल करणे इष्ट आहे असे समितीचे मत आहे. या प्रकरणी बँकेच्या संचालकांनी तक्रार केली म्हणून सदरची बाब उघड झाली नसता उक्त कंपनीने बँकेकडून मोठ्या प्रमाणावरील लाभ उचलला असता असे असूनदेखील विभागाने बँकेच्या अधिका-यांविरुद्ध तक्रार नोंदविणे एवढाच कार्यभाग उरकविला. विभागीय निबंधकांनी कलम ८३ अन्वये चौकशी केली त्या चौकशी अहवालात काय नमूद आहे याची माहितीदेखील विभागीय सचिवांना समितीसमोर विशद करता आली नाही यावरुन शासन या प्रकरणास किती गांभीर्याने घेत आहे हे दिसून येते. त्याचप्रमाणे फौजदारी तक्रार दाखल केल्याने नमूद आहे. परंतु बँकेच्या अधिका-यांनी कर्तव्यात कसूर केली असून संबंधित बँकेच्या अधिका-याविरुद्ध प्रशासकीय स्वरूपाची कार्यवाही करून त्यांच्याविरुद्ध कोणतेही दोषारोप लावले नाहीत याबाबत समिती अतिव खेद व्यक्त करते.

सबब, परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आयु केअर कंपनीने व्याजाच्या रकमेसह रक्कम जमा केली नसल्यामुळे सदरची रक्कम ज्या तारखेला जमा होईल त्या तारखेपर्यंत बाजारभावातील व्याजाच्या प्रचलित संबंधित विमा कंपनीकडून दराप्रमाणे व्याजाची रक्कम वसूल करण्यात यावी. फौजदारी प्रकरण तातडीने निकाली काढण्याविषयी उपाययोजना करण्यात यावी. बँकेच्या संबंधित अधिका-याने विमा कंपनीच्या अस्तित्वाबाबत शहानिशा न करता विमा कंपनीसमवेत करार केला असल्यामुळे बँकेच्या संबंधित अधिका-यांवर प्रशासकीय स्वरूपाचीदेखील कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे एकंदरच कलम ८३ प्रमाणे विभागीय निबंधक यांनी या प्रकरणाची चौकशी केली आहे. त्या चौकशी अहवालात काय नमूद केले याची माहिती समितीला देण्यात आली नाही. एकंदरच हे प्रकरण उच्च स्तरावरून दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचे समितीचे मत असून बँकेने आयु केअर विमा कंपनीसोबत केलेल्या या संपूर्ण व्यवहाराबाबतही समितीला शंका वाटत असल्याने सहकार आयुक्त यांनी या संपूर्ण प्रकरणाचे विशेष लेखा परिक्षण करून यातील तथ्य बाहेर काढावे. विभागीय निबंधकांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या नियम ८३ अन्वये काय चौकशी केली? उक्त चौकशीचे निष्कर्ष काय आहेत? इत्यादी सर्व बाबींची पुनर्तपासणी करून दोषीतांवर कडक स्वरूपाची कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

सन २०१२ च्या दुस-या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ४५६

विधानसभा कामकाज खंड - १६३, पृ.क्र. १२, दिनांक २४ जुलै २०१२. मा. महसूल मंत्री यांनी दिलेले उत्तर.

''राज्यात वाळू व खनिज माफियांचा वाढत असलेला हैदोस..... '' या विषयावर सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांनी मविस नियम २९२ अन्वये दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या सूचनेवर मा. महसूल मंत्री यांनी **''जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.''** असे आश्वासन दिले होते.

विभागाने केलेल्या कार्यवाहीत असे नमूद केले आहे की, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या निर्देशानुसार, जिल्हाधिकारी, गडचिरोली व उप संचालक, भूविज्ञान व खनिकर्म नागपूर यांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने, श्री. खोब्रागडे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशांनुसार श्री. खोब्रागडे यांना कार्यालयीन कामकाजात गंभीर अनियमितता असल्याच्या कारणावरून दिनांक १३ जुलै २०१२ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच शासन आदेश, दिनांक २३ जुलै २०१२ अन्वये श्री. खोब्रागडे यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध दिनांक १३ जुलै २०१२ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीचे दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे.

विभागाने केलेल्या कार्यवाही बाबत समितीचे समाधान न झाल्यामुळे व उपरोक्त आश्वासन हे सन २०१२ च्या दुस-या अधिवेशनातील असून आश्वासनांवर कार्यवाही करण्याबाबत झालेला विलंब पहाता. समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे निदेश दिले समितीने आश्वासना संबंधी अधिक माहिती देण्याबाबत विभागीय सचिवांना सांगितले असता विभागीय सचिवांनी सदर प्रकरणात विभागीय आयुक्त स्तरावरून जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे. संबंधित तलाठ्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई सुरू केली असून विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. अद्याप चौकशी अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत निदेश दिले आहेत. तसेच २ वर्षांत चौकशीची प्रकरणे पूर्ण करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार, चौकशी लवकर पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिका-यांना निदेश दिले आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, संबंधित अधिका-याला पुन्हा कामावर घेण्यात आले आहे काय ? संबंधित अधिकारी दोषी नव्हते काय ?

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, निलंबन केल्यानंतर शासन स्तरावर निर्णय झाला व १० दिवसात संबंधितांना पुन्हा कामावर घेण्याचे आदेश देण्यात आले. माझ्या माहितीनुसार, या प्रकरणानंतर तलाठ्यांचे आंदोलन झाले. त्याचा विचार करून शासनाने हा निर्णय घेतला. त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे मात्र त्यांचे निलंबन रद्द केले गेले.

समितीने अशी विचारणा केली की, निलंबन व विभागीय चौकशी या दोन वेगवेगळ्या बाबी आहेत. चौकशी पूर्ण झाल्याशिवाय निलंबन करता येत नाही. या प्रकरणात निलंबन मागे घेतल्यानंतर सदनात प्रश्न विचारलेला आहे.

यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्याच्या शासन निर्णयाप्रमाणे एखाद्या व्यक्तीने गंभीर प्रकारचा गुन्हा केला नसल्यास सर्वसाधारणपणे निलंबन केल्यानंतर पुन्हा पुनर्स्थापित केले जाते. तसेच विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरू झालेली असल्यास पुनर्स्थापित करण्याबाबत विचार केला जातो. सदर प्रकरणात विभागीय चौकशी सुरू झालेली आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत. विभागीय चौकशी न करता त्यांना पुनर्स्थापित केलेले नाही. पुनर्स्थापित करण्यासाठी विभागीय चौकशी पूर्ण होणे आवश्यक नसून केवळ विभागीय चौकशी सुरू होणे आवश्यक असते. ही घटना घडल्यानंतर सदनात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने कार्यवाही झालेली असून माहिती आपल्या समोर सादर केलेली आहे. तसेच विभागीय चौकशी सुरू केलेली आहे.

समितीने अशी विचारणा केली की, या संदर्भात नुकसान भरपाई निलंबन मागे घेतल्यानंतर दिलेली आहे, असे लक्षात येते. यासंदर्भात संबंधितांविरुद्ध विभागीय चौकशी लागल्यानंतर विहित वेळेच्या आधी विभागीय चौकशी पूर्ण होऊन त्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले, यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात.

यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, विभागीय चौकशीअंतर्गत जो सकृतदर्शनी दोषी आढळल्यास त्याच्यावरील आरोप सिद्ध होईपर्यंत त्याच्यावर निलंबनाची कारवाई करता येत नाही. नुकसानीचे कारण या प्रकरणांतर्गत सादर केले गेलेले आहे. नेमके काय घडले आणि काय सादर केले, याबाबत सखोल माहिती घ्यावी लागेल. ही घटना घडल्यानंतर लगेचच याबाबत चर्चा उपस्थित केली गेली. त्यानंतर विभागीय चौकशीची कारवाई सुरू झाली चौकशीअंतर्गत संबंधित अधिकारी दोषी आढळून आला नव्हता.

समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रश्न उपस्थित केल्यानंतर कडक कारवाई करण्यात आली होती त्यानंतर काय केले ? या संदर्भातील नोटींग विभागीय अधिका-याने चुकीच्या पद्धतीने केले आहे. ज्ञापनान्वये चुकीच्या पद्धतीने ड्राफ्टींग यामध्ये करण्यात आलेली आहे. भविष्यात नोटींगमध्ये अशा प्रकारची चूक होणार नाही, हे संबंधित अधिका-यांने लक्षात घ्यावे. विभागीय चौकशीचे आदेश बजाविल्यानंतर पुढे काय केले ? याबाबत काहीही सांगण्यात आलेले नाही.

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, प्राथमिक चौकशीमध्ये सकृतदर्शनी दोषी अधिका-यांविरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई सुरू करण्यात आली.

समितीने अशी विचारणा केली की, विभागीय चौकशी पूर्ण होऊन संबंधित व्यक्ती दोषी नसल्यास त्याला पुन्हा कामावर घेण्याचा कालावधी हा तीन वर्षाचा असतो. संबंधित व्यक्तीला लगेच कामावर ठेवण्यात आलेले आहे. याचे काय कारण आहे ? सदरहू तलाठ्याच्या निलंबनाच्या विरुद्ध स्थानिक लोकांनी मोर्चे व आंदोलने केली, म्हणून त्याला लगेच कामावर ठेवण्यात आले, असे यामध्ये म्हटलेले आहे. एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत लोकांनी आंदोलन व मोर्चा काढल्यानंतर संबंधित व्यक्तीविरुद्धची चौकशी, निष्कर्ष, नुकसान भरपाई ही प्रक्रिया पूर्ण होण्याच्या आधी नियमाच्या बाहेर कायद्याच्या बाहेर जाऊन त्याला कामावर रुजू करून घेणे योग्य नाही. असा पायंडा पडल्यानंतर कोणीही अशा प्रकारची हिम्मत करून लोकांच्या मोर्चाच्या आधारे त्या प्रकरणातून चौकशीविना बाहेर पडू शकतो. उद्या कोणीही आपल्या अधिकारांचा गैरवापर करण्याकरिता कोणत्याही लिडरच्या हातून मोर्चे घडवून गैरव्यवहाराच्या प्रकरणातून सहज सुटेल. हा पायंडा योग्य नाही. शासनाच्या नुकसानीची पूर्तता न होता, विभागीय चौकशी पूर्ण होण्याआधी सकृतदर्शनी दोषी व्यक्तीस कामावर रुजू करून घेणे कोणत्या नियमामध्ये बसते.

विभागीय सचिवांनी नमूद केले की, याबाबत अधिक सखोल माहिती घेऊन या समितीला लवकरात लवकर सादर करेल.

समितीचे अभिप्राय व शिफारशी :----

''वाळू व खनिज माफियांचा वाढत असलेला हैदोस'' या विषयावरील सर्वश्री एकनाथ खडसे (पाटील) व इतर वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९२ अन्वये दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या सूचनेवर मा.महसूल मंत्री यांनी ''जे दोषी आढळतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.'' असे आश्वासन दिले आहे.

विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, यांच्या निदेशानुसार, जिल्हाधिकारी, गडचिरोली व उप संचालक, भूविज्ञान व खनिकर्म, नागपूर यांच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने, तलाठी श्री. खोब्रागडे यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. सदर निदेशानुसार श्री. खोब्रागडे यांना कार्यालयीन कामकाजात गंभीर अनियमितता असल्याच्या कारणावरून दिनांक १३ जुलै २०१२ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच शासन आदेश, दिनांक २३ जुलै, २०१२ अन्वये श्री.खोब्रागडे यांचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या विरुद्ध दिनांक १३ जुलै २०१२ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीचे दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे.

विभागीय चौकशी पूर्ण होऊन संबंधित व्यक्ती दोषी नसल्यास त्याला पुन्हा कामावर घेण्याचा कालावधी हा तीन वर्षांचा असतो. सदर प्रकरणात संबंधित व्यक्तीला लगेच कामावर ठेवण्यात आलेले आहे. सदरहू व्यक्तीच्या निलंबनाविरुद्ध स्थानिक लोकांनी मोर्चे व आंदोलने केली म्हणून त्याला लगेच कामावर ठेवण्यात आले हे विभागाचे मत समितीला पटत नाही. कारण एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत लोकांनी आंदोलन व मोर्चा काढल्यानंतर संबंधित व्यक्तीविरुद्धची चौकशी, निष्कर्ष, नुकसान भरपाई ही प्रक्रिया पूर्ण होण्याच्या आधी नियमांच्या व कायद्याच्या बाहेर जाऊन त्याला कामावर रुजू करून घेणे योग्य नाही. त्यामुळे समिती याबाबत नाराजी व्यक्त करते.

याप्रकरणी जो अधिकारी यात दोषी आहे त्या अधिका-यावर दिनांक १३ जुलै २०१२ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये चौकशीचे दोषारोप बजावण्यात आले असल्याचे समितीला सांगण्यात आले. सुमारे ४ वर्षांचा कालावधी होत असून देखील या अधिका-याची चौकशी पूर्व न होणे यातच प्रशासन या अधिका-याला पाठीशी घालत असल्याचे समितीला दिसून येत आहे. सदर प्रकरणी दिनांक १३ जुलै २०१२ रोजीच्या ज्ञापनान्वये बजावण्यात आलेल्या दोषारोपासंदर्भात सखोल चौकशी करून संबंधिताविरुद्ध लवकरात लवकर नियमानुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्र. १७१

विभानसभा कामकाज खंड - १६५, क्रमांक - ८, दिनांक २० मार्च २०१३

विषय :-----**''राज्यातील भूविकास बँकेतील कर्मचा-यांची थकित रक्कम देणे, या विषयावरील सर्वश्री सुधीर मुनगंटीवार व इतर वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मा. सहकार मंत्री यांनी''** ''आपले रिव्हायव्हलचे प्रपोजल आहे, ते योग्य वाटले तर विचार करण्यात येईल'' असे आश्वासन सभागृहात दिले होते.

विभागाने केलेल्या कार्यवाहीत असे नमूद केले आहे की, दिनांक ८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूविकास बँकांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली मा. सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दिनांक १४ मे २०१३ व दिनांक २५ जून २०१३ रोजीच्या बैठकांमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून शासनास सादर केलेला समितीचा अहवाल अंतिम करण्यात आला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

विभागाने केलेल्या कार्यवाहीने समितीचे समाधान न झाल्यामुळे उपरोक्त आश्वासनावर विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचे समितीने निश्चित केले.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, भूविकास बँकेतील कर्मचा-यांचे पगार बाकी आहेत. थकीत कर्ज वसूल करावे व तुमचे पैसे घ्यावे, असे आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, दिनांक १२ मे २०१५ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत भूविकास बँका अवसायनात काढण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर दिनांक २४ ऑगस्ट २०१५ रोजी केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे शेतक-यांकडून कर्जाची वसूल होणारी रक्कम, शिखर बँकेतील सद्या उपलब्ध असलेल्या निधीतून शिखर बँकेच्या कार्यरत कर्मचा-यांकरिताची रक्कम व उपलब्ध असलेल्या निधीमधून जिल्हा भूविकास बँकेतील सद्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची थकीत वेतनाची रक्कम प्राधान्याने अदा करण्यात यावी. तसेच २०१२ मध्ये लागू

केलेल्या स्वेच्छा निवृत्तीच्या सुत्रानुसार नुकसान भरपाई अदा करून अशा कर्मचा-यांना सेवामुक्त करण्यात यावे, असा शासनाने निर्णय घेतला होता.

त्यामध्ये बँकेचे सर्व ॲसेट्स आणि आता असलेले कर्ज आणि शिखर बँकेकडे सद्या उपलब्ध असलेला निधी यातून भूविकास बँकेच्या कर्मचा-यांचा निधी द्यावा. हा निधी देण्याकरिता उपलब्ध होणारे पैसे कमी पडल्यास बँकेच्या प्रॉपर्टीज् विकून या कर्मचा-यांची देणी द्यावी. अशा प्रकारचा शासन निर्णय मे महिन्यामध्ये घेण्यात आला.

समितीने विचारणा केली की, त्या कर्मचा-यांचे ब-याच वर्षांपासून पगार नाही. बँकेची प्रॉपर्टीज् विकण्यास वेळ लागणार आहे. तसेच त्यातील ब-याच कर्मचा-यांचा मृत्यू झालेला आहे. कर्मचा-यांची थकीत रक्कम किती आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन्माननीय महोदय, २१६ कोटी रुपये वसूल करण्याकरिता २०१६ पर्यंत वन रँक सेटलमेंटची स्कीम लागू केलेली आहे. २०१६ पर्यंत लोक तयार झाले नाही, तर उर्वरित पैसे शेतक-यांकडून वसूल करावे लागणार आहे. ही वसूल होणारी रक्कम कमी पडल्यास किंवा रक्कम वसूल झाली नाही, तर बँकेच्या प्रॉपर्टीज् विकून ह्या देणी द्याव्यात, असा निर्णय करण्यात आलेला आहे. कर्मचा-यांची थकीत देणी २७० कोटी रुपयांची आहे.

समितीने अशी विचारणा केली की, आपण प्रॉपर्टीज् विकण्याबाबत मोघम सांगितले आहे. पूर्वी भूविकास बँका राज्य स्तरावर आणि जिल्हा स्तरावर एकत्रित होत्या. त्यानंतर जिल्हा स्तरावरील बँका स्वतंत्र करण्याचा शासनाने निर्णय घेतला. तसेच राज्य स्तरावरील बँकांचे अस्तित्व स्वतंत्र केले. प्रत्येक जिल्ह्यामध्ये असलेली प्रॉपर्टीज् शासनाने निश्चित केलेली आहे काय, माझ्या माहितीप्रमाणे त्या प्रॉपर्टीज्ची किंमत अंदाजाने ठरविलेली आहे. ज्या जिल्ह्यामध्ये कर्मचारी आहेत व त्या जिल्ह्यातील प्रॉपर्टीज् निश्चित केलेली आहे. अशी प्रॉपर्टीज् त्या जिल्ह्याला दिलेली आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, होय. त्या त्या जिल्ह्यातील प्रापर्टीज त्या जिल्ह्यातील बँकेच्या नावानेच आहेत. काही प्रापर्टीज शिखर बँकेच्या नावाने आहेत. जिल्हा बँकेच्या नावानेच रहातात.

समितीने अशी विचारणा केली की, त्या, त्या जिल्ह्यातील प्रॉपर्टीज् विकून त्या जिल्ह्यातील कर्मचा-यांची देणी देता येऊ शकते काय ? त्यातील काही बँका चांगल्या होत्या. विशेषतः विदर्भातील भूविकास बँकांच्या प्रॉपर्टीज्चा आढावा घेतला आहे काय, एकूण देणी व एकूण प्रॉपर्टीज्ची रक्कम किती आहे. त्या, त्या जिल्ह्यातील मालमत्ता विकून त्या जिल्ह्यातील कर्मचा-यांचे पगार देण्याचा निर्णय घेतला आहे काय, तसा निर्णय घेतला असल्यास तो कायदेशीर आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, भूविकास बँकेच्या एकूण ७ मालमत्ता आहेत. त्यांची किंमत २०१४-२०१५ मधील बाजार भावाप्रमाणे ५५५ कोटी रुपये होती. तसा निर्णय घेण्यात आलेला आहे. काही जिल्ह्यामध्ये बाकी असलेल्या वसुलीमधून आणि बँकेच्या निधीमधून कर्मचा-यांचे पगार दिले जाऊ शकतात. परंतु असे करून काही जिल्ह्यामध्ये देणी देण्यास रक्कम कमी पडत असल्यास शिखर बँकेकडील रक्कम आणि शिखर बँकेच्या प्रॉपर्टीज् विकून येणारी रक्कम कमी पडत असलेल्या जिल्ह्याकरिता देण्यात येणार आहे किंवा ज्या जिल्ह्यातील रक्कम सरप्लस येईल ती रक्कम ज्या जिल्ह्यात रक्कम कमी पडत असेल त्या जिल्ह्यामध्ये देऊन कर्मचा-यांची देणी देण्यात येईल. असा शासन निर्णय आहे.

समितीने विचारणा केली की, कोल्हापूर जिल्हा बँक त्यांचे कर्मचारी आणि प्रॉपर्टीज घेण्यास तयार असून शासनाचा त्याबाबत काय विचार आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन्माननीय महोदय, कोल्हापूर आणि नाशिक जिल्हा या दोन्ही बँका सद्या चालू आहेत. त्या बँका अवसायनात घ्याव्या किंवा नाही याबाबतचा निर्णय त्या दोन्ही बँकांनीच करावा, असे या शासन निर्णयामध्ये नमूद केलेले आहे. या दोन्ही बँकासुद्धा इतर बँकांबरोबर लिक्वीडेट कराव्यात असा ठराव केलेला आहे. त्यानुसार सर्वच बँकांची अवसायनाची प्रक्रिया पूर्ण करून शासनाची बाकी असलेली देणी आणि कर्मचा-यांची बाकी असलेली देणी वसूल होणा-या रकमेतून कर्मचा-यांची देणी दिल्यानंतर शिल्लक राहिलेली रक्कम सरकार जमा होणार आहे. परंतु ती रक्कम कमी पडल्यास सरकारकडून रक्कम घेण्यात येईल. परंतु सद्या बँकेची ५५० कोटी रुपयांची मालमत्ता असून त्या विचारात घेता व २३९ कोटी रुपयांचे कर्ज वसूल होणे बाकी आहे. ते पहाता २७० कोटी रुपयांचे पेमेन्ट विक्रीमधून आणि वसुलीमधून होऊ शकेल. त्यामुळे शासनाकडे रक्कम मागण्याची आवश्यकता भासणार नाही.

समितीने विचारणा केली की, सोलापूर जिल्हा मधवर्ती बँक ही सोलापूर येथील भूविकास बँक, भूविकास बँकेची प्रॉपर्टी व कर्मचारी विलिन करून घेण्यास तयार आहे. याबाबतीत शासनाची काय भूमिका आहे. सोलापूर जिल्हा मध्यवती बँकेसारख्या आणखी काही बँका भूविकास बँका घेण्यास तयार असेल तर शासनाची काय भूमिका रहाणार आहे. त्या बँका भूविकास बँकेतील कर्मचा-यांना देखील सहभागी करून घेण्यास तयार आहेत. जिल्हा बँका भूविकास बँकेच्या कर्मचा-यांची देणी देण्यास तयार असल्यास याबाबत शासनाचे काय धोरण रहाणार आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन्माननीय महोदय, याबाबतची माहिती सद्या उपलब्ध नसून माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल. या सर्व बँका लिक्विडेशन मध्ये करण्याचा निर्णय शासनाने यापूर्वीच घेतलेला असल्यामुळे तसे होऊ शकणार नाही. याकरिता मंत्रिमंडळाची उप समिती नेमण्यात आली होती. यासंदर्भात प्रलंबित प्रस्ताव होते. उप समितीने त्यावर या बँका लिक्वीडेट कराव्यात असे प्रस्तावित केले होते. त्यानंतर मंत्रिमंडळाने या बँका लिक्वीडेट करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे यासंदर्भातील पूर्वीचे प्रस्ताव पुन्हा विचारात घेतले जाऊ शकत नाही.

समितीने विचारणा केली की, यासंदर्भात शासनाने तीन वर्षांपूर्वी समिती नेमली होती. त्यामध्ये सद्याचे वित्त मंत्री महोदय देखील होते. सदरहू समितीच्या अहवालावर शासनाने कोणता विचार केलेला आहे. शेतक-यांनी भूविकास बँकेकडे गहाण ठेवलेल्या जमिनीवर कब्जेदार सदरी शेतक-यांऐवजी भूविकास बँकेचे नाव लावलेले आहे. सदरहू जमीन शेतकरी कसत आहेत. त्यांच्या वारसांना जमिनीवर कर्ज मिळत नाही. कर्मचा-यांचा विचार करीत असताना शेतक-यांचाही विचार करणे आवश्यक आहे. शेतक-यांना मूळ मुद्दल देऊन किंवा इतर योग्य ती कार्यवाही करून त्यांच्या जमिनी मुक्त होतील अशा प्रकारचा विचार उप समितीने किंवा शासनाने केला आहे काय ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सन्माननीय महोदय, आपण म्हणत आहात ती समिती व त्यानंतर मंत्रिमंडळाने माननीय कृषी मंत्री,
श्री. एकनाथराव खडसे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती नेमली होती. या समितीने यासंदर्भातील सर्व प्रस्तावावर एकत्रितपणे विचार करून या बँका लिक्विडेशनमध्ये काढण्याची शिफारस केली होती. त्यानंतर मंत्रिमंडळाने अंतिमतः हा निर्णय घेतलेला आहे. शासनाने दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत वन मॅन सेटलमेन्ट योजना लागू केलेली आहे. याबाबतची पब्लीसिटी करून सदरची माहिती शेतक-यांपर्यंत पोहचवलेली आहे. शेतक-यांनी या योजनेप्रमाणे दिनांक३१ मार्च २०१६ पर्यंत कर्जाची परत फेड केली तर शेतक-यांचा बँकेचा बोजा कमी करून त्यांचे नाव कब्जेदार सदरी येईल.

समितीने विचारणा केली की, शेतक-यांवर एकूण किती कर्ज आहे ? यामध्ये केवळ कर्मचा-यांचाच विचार न करता शेतक-यांच्या जमिनीचा देखील विचार करण्यात यावा. सदरहू रक्कम वसूल होईल व शेतक-यांच्या जमिनी मुक्त होती. अशा पध्दतीचा विचार करून कार्यवाही करण्यात यावी. शेतक-यांकडे थकीत असलेल्या २१६ कोटी रुपयांमध्ये मुद्दल रक्कम व व्याजाची रक्कम किती आहे.

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, शेतक-यांवर २१६ कोटी रुपये कर्ज आहे. शेतक-यांनी भूविकास बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात दिनांक २८ सप्टेंबर २००७ व दिनांक ३ जानेवारी २०१२ चा शासन निर्णय आहे. तसेच दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत वन मॅन सेटलमेन्ट योजना लागू करण्यात आली असून या तारेखपर्यंत कर्जाची परत फेड केली तर शेतक-यांचा बँकेचा बोजा कमी करून कब्जेदार सदरी त्यांचे नाव लागणार आहे. दिनांक १ एप्रिल २००० नंतर बँकेने व्याजाचे नुतनीकरण रद्द केले असून सदरहू रक्कम त्यानंतरची आहे. मुद्दल व व्याजाचा ब्रेकअप माझ्याकडे आता उपलब्ध नसून त्याबाबतची माहिती समितीस सादर करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, हा प्रश्न शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. शेतक-यांच्या जमिनी भूविकास बँकेला विकल्यात जमा आहेत. प्रत्यक्षात भूविकास बँकेने किंवा शासनाने सदरहू जमिनी विकावयाच्या म्हटले तर ते विकू शकत नाहीत. सदर प्रकरणी कर्मचा-यांच्या बाबतीत ज्या प्रमाणे विचार केला त्याप्रमाणे शेतक-यांच्या बाबतीत मार्ग काढावा. विभागाच्या अधिका-यांनी या संदर्भात काही सकारात्मक मार्ग सूचविल्यास त्याबाबत समितीच्या माध्यमातून शिफारस करण्यात येईल. प्रॉपर्टी विकून शेतकरी व कर्मचारी यांच्या बाबतीत मार्ग काढणे शक्य होईल. मुद्दल व व्याजाची रक्कम किती आहे ?

त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरील माहिती समितीस सादर करण्यात येईल.

समितीचे अभिप्राय व शिफारशी :

''राज्यातील भूविकास बँकेतील कर्मचा-यांची थकित रक्कम देणे'' या विषयावरील सर्वश्री सुधीर मुगनंटीवार व इतर वि.स.स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मा.सहकार मंत्री यांनी **''आपले रिव्हायव्हलचे प्रयोजल आहे, ते योग्य वाटले तर विचार करण्यात येईल''** असे आश्वासन सभागृहात दिले होते.

समितीसमोर साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक १२ मे २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत भूविकास बँक अवसायनात काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर दिनांक २४ ऑगस्ट २०१५ रोजी केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे शेतक-यांकडून कर्जाची वसूल होणारी रक्कम, शिखर बँकेतील सध्या उपलब्ध असलेल्या निधीतून शिखर बँकेच्या कार्यरत कर्मचा-यांकरिताची रक्कम व

उपलब्ध असलेल्या निधीमधून जिल्हा भूविकास बँकेतील सद्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची थकीत वेतनाची रक्कम प्राधान्याने अदा करण्यात येणार असून सन २०१२ मध्ये लागू केलेल्या स्वेच्छा निवृत्तीच्या सुत्रानुसार नुकसान भरपाई अदा करून अशा कर्मचा-यांना सेवामुक्त करण्यात यावे, असा शासनाने निर्णय घेतला होता.

सदर बँकेतील कर्मचा-यांची थकीत देणी २७० कोटी रुपयांची आहेत. शेतक-यांकडून २१६ कोटी रुपये वसूल करण्याकरिता २०१६ पर्यंत वन टाईम सेटलमेंटची योजना लागू केलेली आहे. सन २०१६ पर्यंत शेतकरी तयार झाले नाही तर उर्वरित पैसे शेतक-यांकडून वसूल करावे लागणार आहेत ही वसूल होणारी रक्कम कमी पडल्यास किंवा रक्कम वसूल झाली नाही तर बँकेची मालमत्ता विकून सदर देणी दयावीत असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सद्या बँकेची ५५० कोटी रुपयांची मालमत्ता असून त्या विचारात घेता व २३९ कोटी रुपयांचे कर्ज वसूल होणे बाकी आहे ते पाहता २७० कोटी रुपयांचे पेमेंट विक्रिमधून आणि वसूलीमधून होऊ शकेल. त्यामुळे शासनाकडे रक्कम मागण्याची आवश्यकता भासणार नाही.

याबाबत समिती अशी शिफारस करते की, शासनाने बँकेतील कर्मचा-यांची देणी लवकरात लवकर देण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.

तसेच शेतक-यांनी भूविकास बँकेकडे गहाण ठेवलेल्या जमिनीवर कब्जेदार सदरी शेतक-यांऐवजी भूविकास बँकेचे नाव लावलेले आहे. सदरहू जमीन शेतकरी कसत आहेत. त्याच्या वारसांना जमिनीवर कर्ज मिळत नाही. ही बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. ज्या प्रमाणे कर्मचा-यांचा विचार केला आहे त्याप्रमाणे शेतक-यांच्या जमिनीचाही विचार करणे आवश्यक आहे. शेतक-यांकडून सदरहू रक्कम वसूल होईल व शेतक-यांच्या जमिनी मुक्त होतील अशा पध्दतीची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.